

# श्री साईलीला

री

कि. ५० पैसे

१९६९

# या अंकांत—


१ श्रीसाईबाबा फौंडेशनचें कार्य

२ रमण महर्षि व महात्मा गांधी

३ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति

४ ईश्वर आणि सत्य

५ मनांत आलें कीं—

६ स्वामी चिदानंद ( परिचय )

७ साक्षात्कार

८ संत तुकाबांची अमृतवाणी

९ ग्रंथ-परिचय

१० शिरडी-वृत्त



# श्री साई वाक्सुधा

वाट्यास जें कामकाज आलें असेल तें कसेंबसें पार पाडून द्रव्यार्जन करणें एवढ्याचसाठीं भगवंतानें हा मानवजन्म दिलेला नाहीं. जोंपर्यंत जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी आलों कोठून नि जायचें कोठें, याचा आपण सतत विचार केला पाहिजे. जीवनसाफल्य त्यामध्येंच आहे.

—श्रीसाईचरित्र


श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४७ वें ] फेब्रुवारी १९६९ [ अंक ११ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं ४४३३६१

: कार्यालय :

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,

प्लॉट नं ८०४ बी, दादर, मुंबई १४.

प्रिय वाचक—

# श्रीसाईबाबा फौंडेशनचें कार्य

श्रीसाईबाबानीं आपल्या हयातींत व तदनंतरच्या काळांतही जें लोककल्याणाचें कार्य चालविलें आहे तें अधिकाधिक प्रमाणांत व व्यापक स्वरूपांत चालू रहावें या हेतूनें बाबांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीप्रसंगीं श्रीसाईबाबा फौंडेशनची रीतसर स्थापना सुमारें दोन अडीच महिन्यांपूर्वीं झाली.

हें कार्य विविध स्वरूपाचें आहे. शिक्षणप्रसार, आरोग्य, शुश्रुषा, शेती सुधारणा वगैरे लोककल्याणाच्या नानाविध सुधारणांकडे लक्ष पुरवायचें व त्यासाठीं कार्यकर्ते कामास जुंपावयाचे तर आर्थिक सहाय्याची अत्यंत जरुरी आहे. कोणतेंही कार्य असो; त्याला आर्थिक सहकार जरूर असतो. त्याशिवाय पाऊल पुढें पडूं शकत नाहीं.

तेव्हां या कार्यासाठीं पुरेसा निधि जमा करणें व ठिकठिकाणच्या भक्तांनीं तो उदारहस्तें देणें या गोष्टी फार महत्वाच्या आहेत. हें बाबांचें आवडतें कार्य आहे हें लक्षांत घेऊन त्याला जास्तींत जास्त हातभार लावणें हें प्रत्येकाचें पवित्र कर्तव्य आहे. त्यासाठीं प्रचारकांनीं घरोघर फिरण्याची किंवा कोणांलाही गळ घालण्याची जरुरी आहे असें आम्हांला वाटत नाहीं. प्रत्येकानें स्वयंस्फूर्तीनें जें जास्तींत जास्त देतां येईल तें द्यावयाचें आहे.

फौंडेशनतर्फे जीं कामें व्हावयाचीं आहेत तीं सारीं बाबांच्या आवडीचीं आहेत. तीं पार पडलीं पाहिजेत याची चिंता कोणी वहावयाची ? बाबांच्या भक्तांनीं. अशा कार्याच्या बाबतींत बाबा आपल्या भक्तांना जरूर ती प्रेरणा दिल्याशिवाय कसे रहातील ? मागणी न करतां स्वयंस्फूर्तीनें भक्तांकडून व बाबांच्या कार्याबद्दल ज्यांना श्रद्धा व आदर वाटतो अशांकडून जो सहकार मिळेल तोच खरा व बहुमोलाचा.

त्या दृष्टीनें पहातां साईबाबा फौंडेशनला गेल्या दीड दोन महिन्यांत देणग्यांच्या दृष्टीनें जो सहकार मिळाला तो अत्यंत आशादायक नि उत्साहवर्धक आहे.

एक गोष्ट निश्चित आहे. जनतेच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं आरंभलेलें हें बाबांचें आवडतें व भूतदयेचें कार्य आहे. बाबा तें आपल्या भक्तवृंदांकडून पार पाडून घेत आहेत ही समाधानाची व भावी काळाबद्दल आशादायक घटना आहे.

या अंकांत भक्तजनांकडून गेल्या दीड दोन महिन्यांत स्वयंस्फूर्तिनें ज्या देणग्या आल्या त्यांची सःभार पोंच देण्यांत आली आहे. अशारीतिनें या कार्यास उत्तरोत्तर वाढता सहकार बाबांच्या कृपेनें मिळत जाईल अशी आशा आहे.

—संपादक

# रमण महर्षि व म. गांधी

## दोघांचेही ध्येय एकच

लेखक– **ना. मुरारजी देसाई**

**रमणाश्रमास** मी पहिल्यानें गेलों तो १९३५ सालीं. त्यावेळीं तेथें फारशा इमारती उठलेल्या नव्हत्या व नंतरच्या काळांत श्री रमण महर्षींची जी ख्याति झाली तशी त्या काळांत झालेली नव्हती. त्या पहिल्या भेटीच्या प्रसंगीं मी फक्त एकच दिवस तेथें राहिलों. त्यावेळीं महर्षींच्या सान्निध्यांत जवळजवळ एक तासभर बसण्याची संधी मला मिळाली. तो एक तास माझ्या आयुष्यांत संस्मरणीय होऊन राहिला आहे. त्या अवधींत मला निर्भेळ शांततेचा लाभ झाला.

त्यांना आपण एखादा प्रश्न विचारावा असें मला वाटलें नाहीं. त्या एका तासांत माझ्या अंतर्मनाला जो शांततेचा लाभ झाला, तो अनुभव अविस्मरणीय व जीवन थरारुन सोडणारा होता. रमण महर्षींचा निरोप घेण्यापूर्वी त्यांच्याबरोबर बसून भोजन करण्याचाही लाभ मला झाला. या भेटीमुळें मला जो अनुभव आला त्यामुळें मला एका गोष्टीची जाणीव झाली. ज्यांना साक्षात्कार झाला आहे अशी ही थोर व्यक्ति आहे व अकर्तृत्वांतून कर्तृत्वाची निर्मिती होऊं शकते हेंही आढळून आलें.

युद्धांचा किंवा कलहांचा जन्म मानवी मनांतून प्रथम होतो असें असतां मनांतील कलहाचीं बीजे नष्ट न करतां आम्हीं बाह्योपचारांचा आश्रय घेत असतों. युद्धप्रसंग कशामुळ उद्भवतो ? आम्हांला अधीक मिळविण्याची, दुसऱ्याजवळील वस्तूचा अपहार करण्याची बुद्धि होत असते. इतरांपेक्षां माझ्याजवळ अधीक संपत्ति, अधीक जमीन, अधीक धनदौलत असावी ही माणसाची हांव.

धर्माचें अध्यात्माचें सत्य स्वरूप आम्हीं समजून घेतलें पाहिजे. एवढेंच नव्हे तर तें आचरणात आणण्यासाठीं झटलें पाहिजे; प्रत्येक माणसाचें मन शांततेनें भारावून गेलें पाहिजे. त्याशिवाय जगांत शांतता प्रस्थापित करतां येणार नाहीं. शांतता म्हणजे काय ? युद्ध थांबविणें ही शांतता नव्हे. आम्हीं मनापासून एकमेकांशीं प्रेमानें, बंधुभावानें वागूं लागलें पाहिजे. स्वतःपेक्षां दुसऱ्याचें कसें

होईल याची चिंता करायला शिकलें पाहिजे. हें फार मोठें परंतु वांछनीय उद्दिष्ट आहे; आणि आज नाहीं उद्यां माणसाना व राष्ट्रांना त्या ध्येयाप्रत पोहोंचावें लागणार आहे, याबद्दल मला मुळींच शंका वाटत नाहीं. समजा त्या ध्येयाप्रत कदाचित आपण पोहोंचूं शकलों नाहीं तरी त्यासाठीं आम्हीं अहर्निश प्रयत्नांत तरी असलें पाहिजे. कारण त्या मार्गानें आम्हीं गेलों नाहीं तर कलहाचीं कारणें उत्तरोत्तर वाढतच जातील आणि आपल्या सभोवारचें जग अधिकाधिक तापदायक होईल. त्याची सुधारणा होणें बाजूलाच राहील. आम्हीं सर्वांनीं मानसिक शांतता संपादन करण्याचा निर्धार करून त्या मार्गाला लागलों तर कधीं ना कधीं या जगांत मानवता नांदूं लागेल. आज मानवतेला ग्रहण लागलें आहे. एकमेकांबद्दलचें भय व अधिकाधिक मिळविण्याची हांव नाहींशी झाल्याशिवाय, इतरांजवळ जें आहे तें लुबाडून घेण्याची वृत्ति संपुष्टांत आल्याशिवाय, प्रत्येक राष्ट्रांतील प्रत्येक मानव अंतर्गत शांतता मिळविण्याच्या मार्गास लागल्याशिवाय, तसेंच तुमचा धर्म कोणताही असो, तो श्रेष्ठ तसेच इतर धर्मही श्रेष्ठ आहेत, त्यांचा दर्जा कमी नाहीं ही जाणीव प्रत्येकांत निर्माण झाल्याशिवाय या जगांत शाश्वत शांतता नांदणार नाहीं. कोणत्याही क्षेत्रांत मी इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे व होणार आणि इतरांना मागें टाकणार ही वृत्ती फार वाईट.

तेव्हां ही आवश्यक सुधारणा कशारीतीनें घडवून आणावयाची ? आम्हीं आमच्या अंतःकरणांचा शोध घेतला पाहिजे. आम्हीं स्वतःचे अवगुण शोधून काढले पाहिजेत, तसेंच आमच्यांत अपायकारक गोष्टी कोणत्या आहेत याचा प्रथम शोध लावला पाहिजे. आणि हें जाणून घेऊन ते दोष घालविण्याची मोहीम जोरानें सुरुं केली पाहिजे.

असें कांहींच न करता आम्हीं मोठे सुज्ञ व इतरांपेक्षां श्रेष्ठ आहोंत अशा घमेंडीनें आम्हीं वागूं लागलों व इतरांची सुधारणा करण्याच्या मोहिमेवर निघालों तर त्याच्या परिणाम काय होणार ? दुहेरी नुकसान. शांततेऐवजीं युद्धजन्य परिस्थिति निर्माण होईल. जेथें धर्मभावना नांदत आहे तेथें भयाला व अधाशीपणाला जागा रहाणार नाहीं. तसेंच तेथें हें माझें, हें तुझें, या म्हणण्यालाही जागा रहाणार नाहीं.

आम्हीं सर्व एका भगवंताचीं लेकरें आहोंत. आम्हीं सर्व एका कुटुंबांतील भावंडें आहोंत, ही भावना जेथें जागृत होते, तेथें कोणत्याही प्रकारच्या हिंसेला जागा रहात नाहीं. ज्या ठिकाणीं अहिंसा नांदत आहे, तेथें प्रत्येक जण दुस-

त्याच्या हक्कांची जपणूक करण्यासाठीं झटत असतो. तेथें उच्चनीचपणा नसतो. तेथें समानता नांदत असणे. मनाला शांततेचा लाभ करून देणें हें प्रत्येक धर्माचें आद्य कर्तव्य आहे. ज्याच्या अंतःकरणांत शांतता नांदत आहे, तो दिव्य लाभ ज्याच्या वाट्यास आला आहे, तो आपल्या सभोंवार शांततेचें वातावरण आणण्यासाठीं झटेल. शांतता मिळवून देणें हें वर सांगितल्याप्रमाणें प्रत्येक धर्माचें ब्रीद आहे; परंतु तें विसरून माझ्या धर्माचें अनुयायी जास्तींत झाले पाहिजेत व त्यासाठीं मी झटणार ही भावना निर्माण झाली म्हणजे वाद, कलह व युद्धप्रसंग उद्भवला म्हणून समजावें. तसें सध्या होत आहे. हा जो चढाईखोरपणा आहे तो नाहींसा झाला पाहिजे. त्याच्या नायनाट होणें जरूर आहे.

सध्यांच्या काळांत आधिभौतिक शास्त्रांनी सर्वांवर मात केली आहे. त्यांची प्रगती इतकी झाली आहे कीं माणसांच्या वाढलेल्या गरजा त्यामुळें भागूं लागल्या आहेत. विपुलता म्हणतात ती अलेली आहे; आणि हेंही तितकेंच खरें आहे कीं आधिभौतिक शास्त्रांच्या प्रगतीमुळें नाशाची, संहाराची सोय पराकाष्ठेला पोहोंचली आहे. हें फार झालें; हें आम्हीं आतां थांबवलें पाहिजे. व आधिभौतिकाला अध्यात्माची जोड दिली पाहिजे. तसेंच आमच्या सार्वजनिक जीवनालाही अध्यात्माची जोड करून देण्याची वेळ येऊन ठेपली आहे. आमच्या सामाजिक जीवनांत अध्यात्म नांदू लागलें पाहिजे. तसें झाल्याशिवाय आम्हांला खऱ्याखुऱ्या सुखाचा लाभ होणार नाहीं. आधिभौतिक शस्त्रांची, सुधारणांची कितीही प्रगती झाली तरी त्यापासून आम्हांला सुखाची प्राप्ती होणार नाहीं.

आधिभौतिक शास्त्रें व वाढतें तांत्रिक व यांत्रिक ज्ञान व सामर्थ्य या सर्वांचा मानवजातीला चांगल्यांत चांगला उपयोग होण्यासाठीं माणसांनीं अंतर्गत शांततेकडे वळलें पाहिजे. तिची आराधना केली पाहिजे. ती संपादन केली पाहिजे. ती कशी संपादन करावयाची? साधनेच्या बळावर. साधना त्यागाची, दुसऱ्यासाठीं झटण्याची, दुसऱ्यांचें कल्याण साधण्याची. चढाईखोरपणानें ती साध्य होणार नाहीं. तिचा त्याग करण्यांत आला पाहिजे.

महात्मा गांधींनीं दक्षिण आफ्रिकेंत व आपल्या भारतांत नाना प्रकारच्या लोककल्याणाच्या चळवळी केल्या. परंतु त्यानीं आपल्या मनशांतीला किंवा ज्या लोकांत त्यानीं कार्य केलें त्या लोकांच्या शांततेला धक्का लागूं दिला नाहीं. प्रार्थनेच्या नि निःस्वार्थ व समर्पित जीवनाच्या बळावर त्यानीं एक प्रकारचें सामर्थ्य संपादन केलें होतें. कांही होवो; त्यांच्या शांततेला धक्का पोहोंचत नसे. त्यामुळे ब्राह्यात्कारीही ते सामर्थ्यशाली होऊ शकले. धर्म आणि मोक्ष व कर्म

आणि ज्ञान यांची एकमेकांशी सांगड घालण्यांत आलेली आहे; ती आपण ओळखली पाहिजे. 'श्री रमण महर्षींशीं वार्तालाप' या ग्रंथांत महात्मा गांधीनीं याची कशी बरोबर खूणगांठ घातली होती, त्याचें प्रत्यंतर येते. त्यानीं ज्या ज्या चळवळी केल्या त्या स्वार्थविरहीत व भगवंताच्या नावानें; शरणागतीचा मार्ग स्वीकारून.

१९३९ च्या ऑगष्टमध्यें बाबू राजेंद्रप्रसाद हे रमणाश्रमांत महर्षींच्या सहवासांत कांहीं दिवस राहिले. आश्रम सोडतांना त्यानीं महर्षींपाशीं महात्मा गांधीजींसाठीं संदेश मागीतला असतां महर्षी म्हणाले, "गांधीजींच्या ठायीं अध्यात्मशक्ति वावरत आहे व तीच त्यांच्याकडून कार्य करवून घेत आहे. व त्यांना आगेकूच करायला लावीत आहे. तें पुरेसें आहे. त्यांना आणखी अधीक काय सांगायचें ?„

पुन्हां ता. २० सप्टेंबर १९३९ मध्यें कांहीं कॉंग्रेस कार्यकर्त्यांनीं महर्षि रमण यांची भेट घेऊन त्यांना भारतीय स्वातंत्र्य चळवळीसंबंधीं कांहीं प्रश्न विचारले तेव्हां ते म्हणाले होते, "गांधीजीनीं दैवी शक्तीला वाहूत घेऊन तिची शरणागती स्वीकारली आहे. त्या शक्तीच्या आदेशाप्रमाणें ते कार्य करीत आहेत. त्यांच्या ठायीं स्वार्थाला जागा राहिलेली नाहीं. आपण चालविलेल्या चळवळींचे परिणाम काय होतील याची चिंता ते करीत नाहींत. जे कांहीं परिणाम वाट्यास येतील ते शीरोधार्य करण्याची त्यांची तयारी आहे. राष्ट्रीय कार्यकर्त्यांनीं त्याच प्रकारचें धोरण बाळगलें पाहिजे."

एवढ्यानें समाधान न झाल्यामुळ पुन्हां त्यानीं प्रश्न विचारलेच, "आम्हीं जें कांहीं कार्य चालविलें आहे त्यांत आम्हीं यश मिळवूं का?"

त्यावर महर्षि म्हणाले, "राष्ट्रासाठीं गांधीजीनीं जें कार्य चालविलें आहे त्या मार्गानें जा त्यांचें उदाहरण दृष्टीपुढें ठेवा. शरणागती हाच एकमेव मार्ग आहे."

भारतांत गांधीजी व रमण महर्षि हे दोन महापुरुष होऊन गेले. या दोघांचें श्रेष्ठत्व व परस्परांशीं नातें कोणत्या प्रकारचें होतें याचें श्रीमती सरोजिनी नायडू यानीं पुढील शब्दांत दिग्दर्शित केलें आहे. त्या म्हणतात "भारतात दोन महात्मे आहेत. त्यांपैकीं एक म्हणजे रमण महर्षि. ते आम्हांला मानसिक शांतता देत आहेत. दुसरे म्हणजे महात्मा गांधी. ते आम्हांला एक क्षणही स्वस्थ बसूं देणार नाहींत. भारताचें अध्यात्मिक उत्थापन व्हावें यासाठींच दोघांचेही प्रयत्न चालू आहेत."

— भवान्स जर्नलवरून, साभार —

# जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति

## सर्वांभूतीं प्रेमभावाचा आदेश

आपल्या महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें ज्ञानेश्वर, नामदेव तुकाराम, एकनाथ, रामदास यांच्यासारखे थोर साधुसंत होऊन गेले व त्यानीं जनतेला सन्मार्गास लाविलें त्याचप्रमाणें दक्षिण भारतांत शंकराचार्य, रामानुज व माधवाचार्य यांच्यासारखे थोर व बुद्धिशाली संत महात्मे होऊन गेले. रामलिंगस्वामी (१८२३–१८७४) हे त्याच प्रभावशाली मालिकेंतील एक थोर संत पुरुष होत.

जनतेंत प्रेम व बंधुभाव या गुणांचा प्रचार करून जनतेचा सर्वांगीण उत्कर्ष साधणें हें त्यांच्या जीवनांतील एक प्रमूख सूत्र होतें. बालपणापासून दिव्य स्वरूपाची काव्य प्रतिभा त्यांच्या जिव्हेवर खेळत होती. श्री ज्ञानेश्वरानीं ज्याप्रमाणें अल्प वयांत श्री ज्ञानेश्वरीसारखा अमोलिक ग्रंथ निर्माण केला त्याचप्रमाणें त्यानींही 'अरूल' या नावाच्या दिव्य ग्रंथाची निर्मिती केली.

### मी कशासाठीं आलों ?

या जगांत आपण कशासाठीं आलों हें सांगतांना ते म्हणतात, भगवंतानें या जगांत मला कशासाठीं पाठविलें हें माहीत आहे का ? सर्वांनीं एकमेकांशीं प्रेमभावानें वागावें व आपला उद्धार करुन घ्यावा यासाठींच. सभोंवारची माणसें स्वच्छ कपडे घातलेलीं दिसत असलीं तरी त्या कपड्याआड दडलेलीं त्यांचीं अंतःकरणें स्वच्छ नाहींत. त्याच्यावर काळ्या दुर्गुणांचीं असंख्य पुटें चढलेलीं आहेत, तीं धूवून पुसून मला साफसूफ करायचीं आहेत. अंतःकरणें निर्मळ झाल्या-शिवाय माणसें सुखी होणार नाहींत. तें कार्य मला पार पाडायचें आहे. हे कार्य पार पाडण्याची माझी पद्धत इतरांहून भिन्न आहे. मला कठोर भाषा व कठोर पद्धती यांचें अवलंबन करायचें नाहीं. तें कार्य मला मातेच्या मायेनें पार पाडायचें आहे. या जगांत जन्माला आलेलीं सारीं त्याचीं लेकरें आहेत. त्यानीं

एकमेकांशीं प्रेमानें वागायचें आहे. कोणी कोणाचा द्वेष मत्सर करायचा नाहीं, कोणी कोणावर रागरोष करायचा नाहीं व कोणी कोणाचा अपहार करायचा विचारही मनांत आणायचा नाहीं. सर्वांना एका प्रेमरज्जूनें मला बांधायचें आहे. सर्वांत समानता निर्माण करायची आहे. या जगांत अशा स्वरुपाचा अध्यात्मिक समाजसत्तावाद मला प्रस्थापीत करावयाचा आहे.

## बालपणापासून काव्यस्फूर्ति

रामलिंगम्चें वडील त्याच्या बालपणीं निधन पावले. त्यांचे एक वडील बंधू होते. नोकरी धंद्यानिमित्त ते मद्रासला आल्यामुळें रामलिंगम्चें बालपण तेथेंच गेलें. वयाच्या सातव्या वर्षापासून त्यांना भक्तिपर काव्य करण्याची स्फूर्ति झाली. त्यांची मातृभाषा होती तामीळ. त्याच भाषेंत त्यानीं काव्यरचना केली. ते शिव-भक्त होते. आणि त्यांचें बहुतेक काव्य शिवाला उद्देशून आहे.

ज्याचें लग्न, जन्मल्यानंतर समजूंउमजूं लागल्यावर जिवाशिवाशीं झालें तो या जगांतील एखाद्या मुलीशीं थोडाच विवाहबद्ध होणार? तशा प्रकारच्या लग्नाचा विचार रामलिंगम्च्या मनांत कधींही आला नाहीं. या जगांतील सार्‍या स्त्रिया त्यांना मातेसमान होत्या. पूजनीय नि वंदनीय. हें अगदीं अक्षरशः सत्य होतें.

जो जो भेटेल तो लहान असो मोठा असो, स्त्री असो वा पुरुष असो. तो वंदनीय व माननीय. त्याच्यापुढें ‘करी मस्तक ठेंगणा’ हा होता नित्याचा खाक्या रामलिंगम्चा. प्रत्येकाबद्दल मग तो मानव असो, पशु असो वा पक्षी असो; त्यांचें अंतःकरण करुणेनें भरलेलें असे. भगवान दयामय आहे तसेच रामलिंगम् हे दयामय होते.

रामालिंगम् वयांत आले तेव्हां वडीलधार्‍या माणसांनीं विवाहबद्ध होण्याचा लकडा त्यांच्यामागें लाविला. परंतु वर उल्लेखिल्याप्रमाणें विवाहाचें आणि त्यांचें वाकडे होतें. त्यांना वैवाहिक बंधनाची किंवा वैवाहिक सुखोप-भोगाची जरूरी मुळींच नव्हती; परंतु त्यांचे नातेवाईक मोठे खमंग होते. पोरगा लग्नाशिवाय रहातो म्हणजे काय? असं कधीं घडलं आहे!

मग त्यानीं काय करावें? रामलिंगम्च्यामर्जीविरुद्ध एका दूरच्या

नात्यातील मुलीला आणून त्याच्याशीं तिचें जबरदस्तीनें लग्न लावून टाकण्यांत आले !

परिणाम काय झाला ? जो व्हायचा तोच झाला ! त्या चिखलांत रामलिंगला बिलकूल लोळायचें नव्हते. त्या मुलीचा आणि रामलिंगमूचा संबंध कधींही जूळून आला नाहीं. मात्र या प्रसंगांतून एका अमर काव्याचा जन्म झाला.

भगवंताला उद्देशून त्या काव्यांत ते म्हणतात, 'माझें अंतःकरण तूं ओळखत नाहींस का ? मग कशाला हा जंजाळ माझ्यामागें लावून दिलास ? मला केवळ तुझ्याच भक्तीच्या आनंदांत रहायचें आहे. त्या घाणींत मला क्षणभरही लोळायचें नाहीं. प्रत्येक स्त्री ही मला माते समान; या भावनेनें मी वागत आलों. तेथें दुसरी भावना यावी कुठून ? माझी आई मला आपल्या मांडीवर घेऊन खेळवीत असे. तेव्हांच जगांतील सर्व स्त्रिया या माझ्या माता होत अशी माझी भावना झाली व त्याच श्रद्धेच्या प्रकाशांत मी लहानाचा मोठा झालों. मग आतां त्या विचारांच्या बाबतींत तडजोड कशी बरं घडून यावी ? तें कदापि शक्य नाही.'

## भगवंताचा आदेश

भगवंतानें त्यांची प्रार्थना ऐकली. तूं वाटेल तिकडे जाण्यास मोकळा आहेस असा आदेश त्यांना मिळाला.

झालें; त्यांना हवें होतें तें मिळालें. करुणेनें भरलेलें अंतःकरण; परंतु यावेळीं तें कठोर झालें. "देवाचिया भेटीसाठीं । पडाव्या जिवलगांच्या तुटी" बायको कोणाची आणि भाऊ कुणाचा ! जेथें देवाच्या भेटीची आस लागलेली तेथे कोण कोणाची पर्वा करणार ?

रामलिंगम् मन कठोर करून घराबाहेर पडले; मद्रासहून ते चिंदबरम्ला गेले. शिवालयाबद्दल त्या स्थानाची ख्याति आहे. तेथें कांहीं काल राहून ते शेवटीं पार्वतीपुरम् येथें कायमचे जाऊन राहिले. त्याच्या वास्तव्यामुळें त्या गावाला चिंदंबरंची ख्याति प्राप्त झाली. तेथें त्यानीं लोककल्याणाच्या हेतूनें सत्य-ज्ञानसभा या नावाची एक संस्था स्थापन केली. शिवाची-नटराजाची भक्ति कशी करावी व त्या भक्ती बळावर पुण्यपावन कसें व्हावें याची शिकवण संत रामलिंगम् हे देत असत. धन्य ते लोक कीं ज्याना त्या संताचें मार्गदर्शन लाभलें. करूणामय व्हा; कारूण्याच्या बळांवर जग जिंका असें ते प्रत्येकास सांगत असत.

येथें असतां त्यानीं जी काव्यरचना केली जें जें कांहीं तामिळमध्यें लिहिलें तें सर्व त्यांच्या हयातींत छापून प्रसिद्ध करण्यांत आलें. ‘ तिरु-अरुळ-पा ’ हें आहे त्या ग्रंथाचें नाव. तामीळ भाषिकांची ती गीता आहे.

## अपरंपार काव्यलेखन

संत रामलिंगम्नें काव्यलेखन अपरंपार केलें. त्यांच्या काव्यांची संख्या दहा हजारां पलिकडे गेली आहे. ही वाणी त्यांची नव्हे तर भगवान नटराजच त्यांच्या मुखानें बोलले असें मानण्यांत येतें.

मानवजातीच्या शाश्वत कल्याणासाठीं भगवंताला कांहीं ना कांहीं सांगायचें होतें आणि तें त्यानें संत रामलिंगम्च्याद्वारें सांगितलें. आजवर जनतेंत तीच श्रद्धा वावरत आहे. त्याच भावनेनें मोठ्या भक्तिभावानें त्याची कविता वाचली जात असते.

एवढें महत्त्व त्यांच्या काव्याला कसें बरं आलें असेल ? कारण त्या देवत्त्वाप्रत ते पोहोंचले होते.

परंतु ते स्वतःला कोण समजत असत हे लक्षांत घेण्यासारखे आहे, त्यांना कोणी स्वामी म्हटलेले किंवा बड्या नावानें संबोधलेलें मुळींच आवडत नसे. ‘ मी देव नाही ’ संत नाही आणि कांहीं नाहीं मी तुमच्यासारखाच साधासुधा माणूस आहे. मला कोणी मान द्यावा असें मला वाटत नाहीं. मात्र माझी प्रेमाची व बंधुभावाची शिकवण प्रत्येकानें आचरणांत आणावी एवढीच माझी अपेक्षा आहे.

## एकच ध्येय

रामलिंगम् यानीं आपल्यापुढें एकच ध्येय ठेविलें होतें. सर्व जगांत परस्पर प्रेमभाव नि बंधुभाव वाढावा, सर्वांत समानता व न्यायबुद्धी निर्माण व्हावी. कारण सारें जग सुखी करण्याचा तोच मार्ग आहे अशी त्यांची दृढ श्रद्धा होती; आणि ती चुकीची आहे असें कोण म्हणेल ?

ते पहात होते व त्यांना पूर्ण जाणीव होऊन चुकली होती कीं, आपल्यासन्निध येणाऱ्या प्रत्येकाला कांहींना कांहीं स्वार्थ साधायचा असतो. ते सारे लोक मला देव किंवा सत्पुरुष मानून मला भजतात; परंतु त्यांना माझी

शिकवण मात्र आचरणांत आणण्याची बुद्धि होत नाहीं. त्यांना सर्व समजत होतें व अनुभवास येत होतें.

जग हें असेंच चालायचें कां ? ते या परिस्थितीला शेवटीं कंटाळले. त्यानीं शेवटीं लोकांना उपदेश करण्याचें सोडून दिलें. स्वार्थी जगापासून आपण कुठें तरी दूर दूर जावें असें त्यांना वाटूं लागलें; आणि तशा मनस्थितींत ते आपल्या नेहमींच्या वसति स्थानापासून दूर गेले. तेथें एकांतवासासाठीं त्यांनीं एक लहानशी पर्णकुटी बांधिली व त्यांत ते राहूं लागले.

## शेवटचा संदेश

जाण्यापूर्वी जवळच्या लोकांस त्यानीं सांगितलें कीं मला जें सांगायचें तें मी सांगून मोकळा झालों आहें. आता माझें कार्य संपले आहे. मी आंतां फार दूरच्या प्रवासाला निघणार आहे. मी तुम्हांला यापुढें शरिरानें दिसणार नाहीं; परंतु माझें स्थान तुमच्या अंतःकरणांत आहे. तेथें तुम्हीं मला सदासर्वकाळ पाहूं शकाल. पुन्हां योग्यवेळीं मी तुमच्यांत येईन ही श्रद्धा बाळगा. कोणाचाही कधीं द्वेष, मत्सर करूं नका. सर्वांशीं प्रेमभावानें वागा. हेंच सर्वांना माझें शेवटचें सांगणें आहे. '

## निरोप कसा घेतला ?

संत रामलिंगम् यानीं वरील शब्दांत सर्वांचा शेवटचा निरोप घेतला. ते आपल्या पर्णकुटींत प्रवेश करते झाले. त्या पर्णकुटींत एक सतरंजी पसरलेली होती. तिच्यावर त्यानीं आपला देह पसरला; तत्पूर्वी त्यांनी दरवाजा बाहेरून बंद करायला सांगितला; व त्याप्रमाणें तो बंद करण्यांत आला. तें त्यांचें इच्छा मरण होतें. ही कल्पित कथा नसून सत्यकथा आहे.

त्यावेळचे दक्षिण अर्काटचे यूरोपीयन कलेक्टर जे. एच. गार्स्टीन, आय. सी. एस. यानीं ताबडतोब त्या गावीं जाऊन वरील स्वरूपाची सत्यकथा जिल्हा गॅझेटमध्यें नमूद करून ठेवली आहे.

बापूजींची अमर वाणी

# ईश्वर आणि सत्य

गांधीजी म्हणत असत परमेश्वर हेच सत्य आहे. त्यांच्याच शब्दांत त्यांचे या विषयावरील विचार खाली उधृत केले आहेत.

"ईश्वर हेच सत्य" ही गोष्ट मला एक अमूल्य ठेव वाटते. आपल्या-पैकी प्रत्येकाला ते तसेंच वाटतें. सत्यावरील अविचलित श्रद्धा हेंच आपल्या अस्तित्वाचें एकमेव उद्दिष्ट आहे.

**सत्य म्हणजे काय?**

हा एक कठीण प्रश्न आहे, परंतु त्याचे उत्तर निदान माझ्या पुरतें तरी मला सांपडले आहे. सत्य म्हणजे दुसरे तिसरे कांहीं नसून आपला आतला आवाज जे सांगतो ते सत्य.

मग तुम्ही सहाजिकच विचाराल कीं, मग सत्याविषयी वेगवेगळी माणसे निरनिराळ्या गोष्टींना आणि परस्पर विरोधी गोष्टींना सत्य का मानतात?

तेव्हां त्याचे उत्तर म्हणजे माणसाचे मन असंख्य माध्यमांतून कार्य करतें आणि सर्व माणसाचे मन एकाच पातळीवर उत्क्रांत झालेले नसते. त्यामुळे जी गोष्ट एखाद्याला सत्य वाटते तीच गोष्ट दुसऱ्याला असत्य भासत असेल आणि म्हणूनच ज्यांनी सत्यान्वेषणासंबंधी प्रयोग केले आहेत ते असे म्हणतात कीं, हे प्रयोग करतांना कांहीं पथ्यें व नियम पाळणें आवश्यक आहे. ज्यांनी हे प्रयोग केले आहेत त्याचे म्हणणे असे आहे कीं, प्रत्येक माणसाने त्याला आवाज ऐकू येतो असें म्हणणे बरोबर होणार नाही.

आज असे पुष्कळसे लोक कांहींहि नियम न पाळता आत्म्याचा आवाज ऐकल्याचा दावा करताना दिसून येतात. आज किंकर्तव्यमूढ जगांत

पुष्कळ असत्य गोष्टींचा प्रसार होत आहे. मी नम्रतापूर्वक एवढेच सांगू शकतो कीं, जो विनम्र नाही त्याला सत्य कधींच सांपडणार नाही. जर तुम्हाला सत्यरूपी सागरावर पोहावयाचे असेल तर अहंभाव सोडला पाहिजे.

ईश्वर मला व्यक्तिरूप वाटत नाही. सत्य हेच मला ईश्वर वाटते. भौतिक राजा आणि त्याचे कायदे वेगवेगळे असतात त्याप्रमाणे परमेश्वराचे नियम आणि परमेश्वर एकमेकांपासून भिन्न असत नाहीत.

परमेश्वर म्हणजे सत्य आणि प्रेम, परमेश्वर म्हणजे नीतिशास्त्र आणि नैतिकता, परमेश्वर म्हणजे निर्भयता अशी माझी ईश्वराबद्दलची कल्पना आहे.

परमेश्वर म्हणजे प्रेम असे जे म्हणतात त्यांच्याशी मीहे खरे आहे असें म्हणेन, परंतु परमेश्वर म्हणजे सत्य हे त्यापेक्षां अधिक खरें किंवा अंतिम सत्य आहे आणि प्रेम हा त्या सत्याकडे जाण्याचा सर्वात जवळचा मार्ग आहे.

## सत्य हेच परमेश्वर आहे

सत्याचा शोध करण्याची तीव्र इच्छा असलेल्या नास्तिकवाद्यांनी ईश्वराचे मुळीं अस्तित्वच नाकारण्यास मागेपुढें पाहिलेले नाहीं. हें त्यांच्या दृष्टीनें विचार करतां बरोबर आहे. परमेश्वर हेच सत्य आहे असे म्हणणे जास्त उचित ठरेल.

परंतु जोपर्यन्त आम्ही ह्या नश्वर शरीरांत बांधले गेलो आहोत तो पर्यन्त खऱ्याखुऱ्या सत्याची प्रचीति येणे कठीण आहे. केवळ कल्पनेनेच त्याच्या स्वरुपाची आपणाला कल्पना करतां येईल. या क्षणभंगुर शरीराच्या माध्यमांतून शाश्वत सत्याचे स्वरूप पाहणे कठीण असल्यानेच श्रद्धा हेच त्याबाबतींतील आपले साधन ठरते म्हणून श्रद्धेवरच अवलंबून रहावे लागतें.

सत्य हे स्वभावतःच स्वयंसिद्ध व स्वयंप्रकाशित असतें. त्याच्यावरील अज्ञानरूपी जळमटें दूर करतांच तें चमकू लागतें सत्याच्या प्रत्येक अविष्कारांतून सत्याचा प्रसार होतो. सूर्यानी आपलें किरण लपवायचे म्हटलें तर त्याला जसे ते प्रकाश लपवितां येत नाहीत तसेंच प्रत्याच्या प्रकालाहि आहे.

मानवी जीवन ही एक अत्यंत गुंतागुंतीची बाब आहे. सत्य आणि अहिंसा या संबंधीच्या प्रश्नांची उकल पृथक्करणात्मक किंवा तात्विक पद्धतीनें

नव्हे तर सत्याचा आग्रह धरून म्हणजे आत्मिक बलानें आणि मूक प्रार्थनेंतूनच सत्यान्वेषण व तद्‌विषयक प्रश्नांची उकल होईल. विनम्रता आणि मूक प्रार्थना यांनी मला योग्य मार्ग कोणता तो दाखविला आहे.

मी ह्या महान शक्तीला अल्ला किंवा खुदा या नांवाने संबोधित नाही तर त्याला सत्य ह्याच नांवाने संबोधितो. मजसाठीं सत्य हेच परमेश्वर आहे आणि सत्य सर्व श्रेष्ठ आहे. पूर्ण सत्य फक्त महान शक्तीच्या हृदयांत वास करीत असतें. एक महान इंग्रजानें मला परमेश्वर अज्ञांत आहे, ह्यावर विश्वास करावयाला शिकविले. आपल्या बुद्धीची झेप जितकी लांब पोचूं शकेल तेथपर्यंतच तो जात आहे. लक्षावधी लोकांनी परमेश्वराच्या नांवाखाली असंख्य अत्याचार केले आहेत. म्हणजे शास्त्रज्ञ सत्याच्या नांवाखाली अत्याचार करत नाहींत असें नव्हे. आपल्याला माहीतच आहे कीं, शास्त्र आणि सत्याच्या नांवाखाली पशूंवर किती निर्घृत अत्याचार केले जातात. त्यापुढें ह्या मार्गात खूपच अडीअडचणी आहेत.

मनुष्य अधिक विचार करू शकत नाही आणि सर्व शक्तिमान अशा शक्तीबद्दल मर्यादित बुद्धिमत्तेनें विचार करतांना बऱ्याच अडचणी येतील. हिन्दु तत्वज्ञानानुसार फक्त परमेश्वरच शाश्वत आहे. बाकी सर्व जग नाशवंत आहे. इस्लामच्या कुराणातही हेच सत्य सांगितले आहे. संस्कृतमध्ये सत्य शब्दा करितां ‘ सत् ’ शब्द आहे. याचा अर्थ जे विद्यमान आहे. ह्या आणि इतर अनेक कारणांमुळें मी ह्या निष्कर्षाप्रत पोहचलो आहे की, सत्य हाच परमेश्वर आहे. परमेश्वराच्या या व्याख्येनें मला खूपच समाधान लाभले आहे. या सत्यरूपी परमेश्वराचा शोध घेण्यासाठीं प्रेम व अहिंसा हा एकमेव मार्ग आहे. साधने आणि साध्य हे अंतिम एकत्र असल्यानें ईश्वर म्हणजे प्रेम हेहि मला पटतें.

# मनांत आलें कीं—

(ले. द. शं. टिपणीस.)

(सप्टेंबर १९६८ च्या अंकावरून पुढें चालू)

## (५३) द्रोणाचा चक्रव्यूह.

कौरव पांडवांच्या युद्धांत द्रोणाचार्यांनीं चक्रव्यूह रचला होता. युद्धनीतिचा डावपेंच म्हणून व पांडवांची कोंडी करावी म्हणून. कोंडींत न सापडतां चक्रव्यूहाचा भेद करणें जय प्राप्तीस जरूर असतें. या चक्रव्यूहांत शिरणें व त्यांतून सुखरूप बाहेर पडणें, ही एक युद्धकला आहे. पांडव वीरांना ती अवगत नव्हती. फक्त अभिमन्यूला चक्रव्युहांत कसें शिरावें हें माहीत होतें; पण त्यांतून बाहेर कसें पडावें हें तो जाणत नव्हता. म्हणून तो वीर प्राणास मुकला. अशीच स्थिति बहुतेक मानवांची होते. कारण हें विश्व म्हणजे एक चक्रव्यूहच आहे. मायेनें रचलेला हा व्यूह. या व्युहाच्या आंत नाना विषय मोहक रीतीनें मांडून ठेवले आहेत. त्याच्या मोहानें व अहंकाराच्या नादानें जो तो या चक्रव्युहांत प्रवेश करतो. आंत मध्यें काम, क्रोध, लोभ मत्सरादी एकापेक्षां एक पराक्रमी असुर वीर दबा धरून बसलेले असतात. आंत आलेला मानव विषयांच्या मोहिनीनें भारून वासना विकारांच्या आहारीं जातो. तो विषयांतच रमून जातो. त्यावर काम क्रोधादी असुर वीर हल्ला करून बेसावध अशा या मानवाला नामोहरम करतात. मानवांतील देवत्व मारून ते आपल्या प्रमाणें त्याला असुर बनवतात. मग तो आपण कोण, कशासाठीं आलों हें विसरून तोही त्यांच्यांत कायम राहतो. या चक्रव्युहांत शिरण्याचें मानवाला माहीत असतें पण आंत गेल्यावर शत्रूला जिंकून त्यांतून बाहेर कसें पडावें याचें मात्र त्याला ज्ञान नसतें. संसार चक्रांत शिरणारे लक्षावधी पण जिंकून माघारीं परतणारा लक्षात एक. अभिमन्यू प्रमाणें बहुतेकांची स्थिति होऊन ते जन्मोजन्मीं चक्रव्युहातच चकरा

घालीत राहतात. दैवयोगानें एकादा कृष्ण, स्थितप्रज्ञ महात्मा भेटला तर तो मात्र बाहेर पडण्याची नेमकी वाट दाखवूं शकतो. स्वता चक्रव्यूहांत शिरून शत्रूंना जिंकून जे चक्रव्यूहांतून बाहेर पडले आहेत त्यांनाच चक्रव्युहाची गुरुकिल्ली माहित असते. सद्गुरूला शरण जाऊन, त्यांच्यावर निष्ठा ठेवून त्यांच्य आदेशा प्रमाणें वागून जो कोणी ही गुरु किल्ली हस्तगत करील तोच या चक्रव्यूहाचा भेद करुं शकेल.

## (५४) कापल्या करंगळीवर—

जंगलांतील मार्ग. वाटेंत एक खड्डा होता. तसा कांहीं तो मोठा नव्हता. पण अगदीं लहानही नव्हता. पाय गेलाच तर मुरगळेल इतपत. लोक त्या मार्गानें जा ये करीत. कित्येक खड्डा टाळून बाजुनें जात. कित्येक त्यावरून उडी मारून जात. पायापुरते पहाणारे हे लोक. साधें काम पण तो बुजवायचे कोणी करीना. पाऊस आला कीं पाणी वाहत येई. जातां जातां खड्डा भरून मग पुढें जाई. पाण्याचा हा गुण आहे. वाटेंत खड्डे खळगे आले तर ते भरून मग पुढें धांवत सुटतें. जीवन मार्गावर संकटाचें अडीअडचणीचे हाल अपेष्टांचे लहान मोठे खांच-खळगे असायचेच. पुष्कळसे ते टाळून त्यांकडे दुर्लक्ष करून पुढें सटकूं पहातात. पण टाळल्यानें ते भरून येत नाहींत, त्यांचें निराकरण होत नाहीं. धैर्यानें तें भरून काढण्याचा व नाहींसे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कांहीं आपल्या पुरता प्रयत्न करतात पण इतरांच्या मार्गांतील अडचणी दूर करण्याचा कधींच प्रयत्न करीत नाहींत. कोणी संगटग्रस्त दिसलाच तर दुर्लक्ष करून सरळ पुढें निघून जातात. वास्तविक आपण जगावें व इतरांना जगवावें हा जीवनाचा मंत्र. यांत माणुसकी आहे. ज्यांत श्रम नाहींत, खर्च नाहीं, जातां जातां सहज मदतीचा हात देतां येतो पण तोही पुढें न करणारे महाभाग भरपूर आहेत. आपल्याखेरीज इतरेजनही माणसेच आहेत हेंच मुळीं कित्येकांच्या डोक्यांत येत नाहीं. मानवी जीवन जेव्हां पाण्याप्रमाणें वाहूं लागेल व जातां जातां मदतीचा हात देण्याची संवय जेव्हां मानवाला लागेल तेव्हांच माणूसकीची आशा करावी. तों पर्यंत कापल्या करंगळीवर—असेंच चालायचें.

## (५५) टिप टिप कागद

टिप कागद सर्वांच्या परिचयाचा असावा असें वाटतें. अलिकडे पेनमुळें त्याचा वापर कमी झाला आहे. पण छे छे आता पेनमुळें विद्यार्थ्यांना

टिप कागदाची जरुरी असतें. पण विद्यार्थी भले खुशाल डाग पाडतात व पडूं देतात. प्रत्येकाजवळ टिप कागद पाहिजे जो टिपतो तो टिप कागद. टिपतो खरा परंतु नुसते टिपत नाहीं तर डाग पडूं देत नाहीं. पडलाच तर पसरूं देत नाहीं. काळी शाई टिपून पांढऱ्यावर काळे डाग पडूं देत नाहीं. ( मुळांत शाई काळी होती. सुधारणेचें वारे लागल्यामुळें निरनिराळ्या छटांचे शालू नेसून आज ती मिरवते तें निराळे ) टिप कागदाला इंग्रजीत ब्लॉटिंग पेपर म्हणतात. ब्लॉट म्हणजे डाग. जो डाग टिपतो तो ब्लॉटिंग पेपर. टिपकागदाच्या ठिकाणीं असलेली ही टिपणींची कला माणसालाही अवगत पाहिजे. आयुष्याला उपयुक्त आहे फार ती. स्वतांचें दोष टिपून घेऊन माणसानें तें नाहीसे करावें. स्वतांचा स्वतांच टिपकागद व्हावे. आजच्या जीवनपटावर कर्माच्या लेखणीनें व तृष्णेच्या शाईनें भविष्यकाळांतील जीवन आपण लिहित असतो. तें लिहितांना भरपूर डाग पडतात. पडला कीं लगेच टिपून घ्यावा व नाहींसा करण्याचा प्रयत्न करावा, त्या योगें भविष्यकाळांतील जीवन पटावर स्वच्छ लिहिलें जाईल. आपल्याप्रमाणें इतरांचेही दोष टिपावे व ते काढून टाकण्यांत त्यांना मदत करावी. इतरांचें दोष टिपणें चांगलें पण टिपून काढणें वाईट.

## ( ५६ ) सोन्याचें नाणें नसावें तर

इंग्रजी आमदानींत सोन्याचें नाणे होतें. गिनी म्हणत त्याला. तें फक्त भारतांत ओळखलें जाई. अमेरीकेंत व्यवहारांत त्याला मोल नव्हतें. तिथें त्यांचा सोन्याचा डॉलर महत्वाचा. पण या डॉलरला इंग्लंडमध्यें महत्व नाहीं. तेथें पौंड महत्वाचा. दुसऱ्या एकाद्या देशाच्या बाजारांत पौंडाला कोणी विचारणार नाहीं. तेथें त्या देशाच्या सोन्याच्या नाण्याला जो तो धरुं पहातो. गिनी, डॉलर, पौंड सर्व सोन्याची खरी पण त्यांचें अधिकार क्षेत्र मर्यादित आहे. विशिष्ठ मर्यादेंत त्यांना मोल. पण हीं नाणीं ज्याची बनविली आहेत तें सोनें ? त्याचा सर्वत्र अधिकार. तो मर्यादित नाहीं. सोन्याचा अधिकार सर्व क्षेत्रांत सर्व स्थळीं चालतो. ऐहिक गोष्टींमुळें लाभलेलें सामर्थ्य मर्यादित असतें. ठराविक क्षेत्रांतच तें ओळखलें जाते. मुंबई पोलीसांचा अधिकार मुंबईतच. रशियांत त्याचें काय होय ? रशियन पोलीसाला अमेरीकेंत कोण मानणार ? सर्वच ऐहिक अधिकार असें मर्यादित असतात. अशा व्यक्तीनें आपलें सामर्थ्य अमर्याद आहे असा अभिमान बाळगण्यांत ताठा चालविण्यांत काय अर्थ आहे ? अगदीं उच्चाधिकारी असला

तरी ते सोन्याचे नाणेंच. कोणाच्या तरी कृपेचा शिक्का असलेले. माणसाला अधिकार असावा. पण कसा ? सोन्यासारखा, जगांत सर्वत्र ओळखला जाणारा, सर्वत्र मान मिळणारा. टागोरांचे सामर्थ्य सर्व जगांत ओळखलें जातें. म. गांधीचा अधिकार जगन्मान्य आहे. स्वामी विवेकानंदाना भारताप्रमाणें अमेरीकेंतही मान आहे. संत, विद्वान, शास्त्रज्ञ सर्वांना वंदनीय असतात. कारण ही नुसती सोन्याची नाणी नसतात तर प्रत्यक्ष सोने असतात. त्यांच्याकडे सोन्याचा अधिकार असतो. कोणा राज सत्तेनें हा अधिकार त्यांना दिलेला नसतो. अंतर्गत चैतन्यानें त्यांना हा अधिकार दिलेला असतो. हा खरा टिकाऊ अधिकार. सोन्याचें नाणें नव्हे तर सोनें व्हावें.

## ( ५७ ) मोडतोड

नुकसान झालें नासधूस झाली कीं वाईट वाटतें. सहाजिक आहे. विपत्ती आली तर कोणाला आनंद वाटेल ? अशी एखादीच कुंती. पण सर्वसाधारण मनाला आनंद देणाऱ्या या गोष्टी नाहींत. अतःकरण व्यथित होते. मन दुःखीत होते. खरोखरच त्यांत व्यथित होण्यासारखें आहे काय ? नुकसान नासधूस मोडतोड होते म्हणून तर जगाची प्रगति होते. मृत्यु आहे म्हणून जीवनाला मूल्य आहे. मृत्यूच्या पोटीं नवीन जीवनाचें बीज असते. आग लागली म्हणूनच ना लंडन शहर सुंदर झालें ? महायुद्धाच्या संहारांतूनच ना यू. एन. ओ. मुखीं शांति मंत्र घेऊन जन्मास आली ? लांब कशाला शोधा. आपल्या घरांतील बच्छडी छबडीच बघाना. किती खेळणी, किती पाट्या व इतर वस्तू मोडतात तोडतात व किती कपडा फाडतात ! आपणाला पुन्हां त्या विकत घ्याव्या लागतात. यामुळें मालाला उठाव येतो, कारखानें चालतात, लोकांना कामधंदा मिळतो व राष्ट्रीय संपत्तींत भर पडते. आज कापड खरेदी करा. वर्षाच्या आंत त्याचा निकाल करणार काय ? घेतो पुन्हां नवीन. सर्व वस्तूंचें असेंच. टिकाऊपणा नाहीं. लौकर खराबी. मोडतोड. परिणाम ? खप धंदा चालू राहतो. कल्पना करा कीं उद्यां वस्तू भरपूर टिकूं लागल्या तर औद्योगिक क्षेत्रांत काय होईल ? क्रांति. मालाचा वारंवार उठाव होणार नाहीं. कारखान्यांत माल पडून राहिल. ते बंद होतील. बेकारी वाढेल. यामुळें दारिद्र्य वाढेल. परिणामीं अनीति भ्रष्टाचार समाजांत फैलावतील. खोल विचारांनीं आणखी कितीतरी परिणाम ध्यानीं येतील. दिखाऊ पण न टिकाऊ माल औद्योगिक प्रगती वाढवतो तर खरा

चांगला माल प्रगतीला खुंटवतो. यास्तव कापड काय व इतर वस्तू काय अल्पायुषी निपजाव्यात म्हणून कारखाने कोशीस करतात. असं आहे. म्हणून मोडतोड नुकसान याबद्दल खेद करूं नये. खंत मानूं नये. उलट यांतून कांहीं तरी चांगलें घडेल असें समजून समाधानी राहवें. चालायचेच म्हणावे आणि सोडून द्यावें.

## ( ५८ ) नथीची शोभा नाकांत.

विद्या व कला हें मानवी जीवनाचे अलंकार आहेत. अलंकारानें शरीराला शोभा येते तर विद्या व कला यांनीं जीवन शोभून दिसतें. अलंकार मग तें सोन्याचे असोत नाहींतर मोत्याचे असोत ज्यावेळीं जिथें वापरावयाचें त्यावेळीं तिथेंच वापरल्यानें शोभा देतात. नाकांतील नथ कानांत वापरल्यानें व कानांतील डूल नाकांत वापरल्यानें शोभा तर यायची नाहींच उलट तें बेढब दिसून हास्यास्पद ठरेल. मोत्याचे तोडे मनगटाला शोभा आणतात म्हणून एकाद्यानें ते ओवून गळ्यांत घातले तर शोभा येईल काय ? फुलांच्या गुच्छाची सुंदर फुलदाणी टेबलावर शोभायमान दिसते म्हणून ती कोळशाच्या पोत्यावर ठेवल्यानें काय शोभा येणार आहे ? बैठक चुकली स्थळ चुकले कीं चांगल्याचेही हें असें वाईट होते. लग्न प्रसंगीं वा एकाद्या शुभप्रसंगीं दागिन्यांनीं मढून गेल्यास सभारंभास शोभा येईल. पण एकाद्या दु:खीताचें सांत्वन करण्यसाठीं असें नटून थटून गेल्यास तें चमत्कारीक ठरेल. शिवाय टीकास्पद ठरेल. वेळ प्रसंग चुकल्यानें विद्या व कला यांचे असेच होते. जरुर तेथें व योग्यवेळीं विद्या प्रगट केली तर कौतुक होते. विद्वत्तेला मान मिळतो. वाटेल तेव्हां वाटेल तेथें वाटेल त्या तऱ्हेनें विद्वत्तेचें प्रदर्शन करणें कौतुकाचे राहूं द्याच पण निंदेला मात्र पात्र ठरेल. असेंच कलेचें. एखादा उच्च दर्जाचा नट असला तर त्याची ती कला रंगमंचकावर खुलून शोभून दिसेल. तिचें कौतुक होईल पण तोच नट व्यवहारांतही उठल्या सुटल्या शद्बांच्या फेकी व अभिनय करुं लागला तर तें समाजांत शोभणार नाहीं. त्याची शोभा होईल. एखाद्या गोड गळ्याच्या गायकाचें गाणें बैठकींत वा अन्य शुभप्रसंगीं हृदय हेलावणारे वाटलें तरी तो गवयी एकाद्याच्या यात्रेस जातांना सुगम संगीत अगर एखादी चीज म्हणूं लागला तर त्याचा तोच गोड आवाज हृदय तर हेलावणार नाहींच उलट तो खवळायला कारणीभूत होईल. अशावेळीं आम्ही जातो आमुच्या गांवा हेंच

योग्य. पण लग्नप्रसंगीं हें कोण ऐकून घेईल ? हें सर्व ओळखून त्यांच्या प्रगटीकरणास योग्य स्थळ काल वेळ आहे कीं नाहीं इकडे लक्ष देणें जरूर आहे. नाहींतर चांगल्यावर वाईटाचा. शिक्का पडायचा सहज तें सहज, तें कोठेही शोभून दिसते. पण मुद्दामाला स्थळ व कालांची मर्यादा असते.

## (५९) बीजोपनिषद.

शून्य म्हणजे काय ? कांहीं नाहीं. nothing अभाव. जें नाहीं त्यातें गुणलें काय, त्यांत मिळवलें काय किंवा त्यांतून वजा केलें काय; त्यांत काय फरक पडणार ? तें तसेंच राहणार. जें मूळ अव्यक्त, आहे नाहीं ज्याला म्हणतात त्याला आपण वाढवूं शकत नाहीं कीं कमी करूं शकत नाहीं. जो अभाव (nothing) त्याला वर्तुळाकार मर्यादा घातली कीं शून्य होते. मर्यादा घातली कीं आकार येतो. आकार आला कीं त्याचें आपल्या इंद्रियांना ज्ञान होतें. सर्व सृष्टी अशीच झाली. जो कोण मूळ त्यानें स्वतांला मर्यादा घालून घेतल्या व निरनिराळे आकार धारण केलें. त्यांना आपण नांवे दिली व सर्वांच्या बेरजेस सृष्टी म्हटले. त्यानें हें मुळांत केलें त्यानें तें मुद्दाम केलें नाहीं. आपोआप सहज झालें. मर्यादा आली, माया आली म्हणून झाले. पण तें मुळ काय, कसें विभागलें (हा आभास आहे.) तें कळत नाहीं कारण हें तो अनुभवाचें ज्ञान. पण शास्त्रज्ञ मात्र तें मूळ शोधण्यांत गढून गेले आहेत. त्यासाठीं बुद्धिचा उपयोग करून वस्तूमात्राचे विच्छेदन (analisis) करीत आहेत. नवीन नवीन गोष्टी मिळत आहेत. पुन्हां त्यांचें विच्छेदन चालू आहे. हिस्सेरशी चालू आहे. पण मुळाचा पत्ता नाहीं. पण तें आहे नक्की. बेपत्ता नाहीं. ज्याला हात लावतात तेथेंच ते त्यांच्या बोटाखालीं असते. पण त्यांना कळत नाहीं. कसें कळणार ? शून्यास, अभावास भागल्यानें भागाकार असाच अनंतापर्यंत (infinite) चालणार. शास्त्रज्ञ थकतील. अनुभवानें तें कळणार. बुद्धि लंगडी आहे. सद्गुरुचा एकच स्पर्श ब्रह्मांडाचे बीजगणित उलगडून दाखवील.

## (६०) तळे व शेवाळ

घनदाट जंगल, वाटाड्याशिवाय रस्ता मिळणें कठीण. एक पांथस्थ जंगलांतून चालला होता. कोंठें जायाचें हें तो विसरून गेला होता. शिवाय वाटाड्याही नव्हता. काट्याकुट्यांतून नुसती भ्रमंती चालली होती. त्यांत

रखरखलेलें ऊन. पुन्हां तहानेनें व्याकूळ झालेला जीव. घसा कोरडा पडला. पाणी पाणी. जीवन पाहिजे. कसें मिळणार ? शोध शोध शोधत होता. पुष्कळ तळीं दिसली पण सगळी हिरवीगार. त्यांत पाणीच दिसेना खरं म्हणजे तो जिथें उभा होता तिथें शुद्ध स्वच्छ पाण्याचें तळे होते पण हिरवागार रंग पाहून त्याला वाटलें कीं तें कुरण आहे. इतर ठिकाणें शोधली पण तळे नाहीं. सगळी कुरणेच. फिरफिर फिरला. थकला व अशाच एका कुरणच्या काठीं वृक्षाखाली पडून राहिला. तिकडून एक माणूस आला. हा थकलेला पाहून त्यानें विचारले, "काय भाऊ, असें पडून कां राहिलेंत ?" क्षीण आवाजांत उत्तर आले, "थकलो. तहानेनें व्याकूळ झालोय. पाणी पाहिजे. खूप शोधलं पण भेटलं नाही. तो माणूस म्हणाला, "असा झोपून काय राहतोस ? उठ, तुझ्याजवळच हा केवढा मोठा तलाव आहे बघ. पी की त्यातील पाणी." पांथस्थ म्हणाला, "काय राव, थट्टा करतां गरिबाची. आहो, ते तर गवताचे कुरण आहे" माणूस उत्तरला, "वेड्या, तें कुरण नाही. पाण्यावरचें तें शेवाळ आहे. तें बाजूला कर." पांथस्थानें शेवाळ बाजूला केलें. खाली थंडगार स्वच्छ पाणी. पिऊन तृप्त झाला. रखरखलेल्याला थंडगार पाण्याचा स्पर्श म्हणजे ब्रह्मानुभवाचा आनंदच तो. सर्वच या आनंदासाठीं तहानेलेले आहेत. कोणी कमी तर कोणी जास्त. कुठें जायचें कसें जायाचें हें मात्र कोणता माहीत नाही. वास्तविक आपलें आहे आपल्यापापाशी. पण कल्पनेच्या भरारीवर इकडे तिकडे नुसती भ्रमंती चालली आहे. नाकांतली नथ घरभर शोधतो आहोत. आहे जवळच. पण त्यावर अज्ञानाचें मायाचें शेवाळ आहे. आपण व्याकूळ होऊन थकलों कीं कोणी तरी येईल, अवचित दाखवील. तेव्हां हें शेवाळ दूर होईल व आपण त्या चैतन्यांत न्हाऊन निघूं. पण असा कोणी तरी येईल तेव्हां. तोंवर भ्रमाच्या भ्रमंत्या चालूच.

## ( ६१ ) कसेल त्याची जमिन

अगदीं योग्य घोषणा आहे. ज्यानें पेरावें त्यानें खपावे. त्यानेंच कापावें व खावें. यांत अन्याय कांहीं नाहीं. कर्मानेच घालून दिलेला हा नियम आहे. ज्यानें केलें त्यालाच त्याचें फळ मिळतें. त्यावर मालकी त्याची. त्यानेंच खावें. इतरांनीं खाऊं नये. त्यांना ती मिळायची नाहींत. हाच नियम सर्वत्र. हाच नियम शेत-

कऱ्यांना. क्वचित ( हल्ली नेहमींच ) दुसरें येऊन खाऊन जातात, पण त्यांना नंतर कटु फळें खावी लागतात. शेतकरी श्रम करतो, उन्हा पावसांत खपतो, खतपाणी घालतो. मग येणाऱ्या पिकावर त्याची मालकी नसावी तर मग कुणाची ? त्याचीच मालकी. त्यालाच तें मिळावें. यांत वावगे तें काय आहे. पण नाहीं. माणसाला हें मान्य नाहीं. आपलें ठेवून तो इतरांचें खात बसतो. वास्तविक पिकावर मालकी शेतकऱ्याची पण त्यांत फुकटच्या फाकट वाटे इतरांचे हा जगाचा न्याय. आतां पिकावर शेतकऱ्यांची तरी सर्वस्वी मालकी आहे कां ? हाही विचार व्हावा. जें पिकतें तें सर्वस्वी त्यानेंच पिकविले हे तरी खरें कां ? कसेल त्याची जमीन. शेतकरी कसतो खरा पण पिक येण्यांत दुसरा कोणाचा वांटा नसेल कशावरून ? सोन्यासारखे पिक काय केवळ शेतकऱ्याच्या श्रमामुळें येते ? तसें असतें तर दरवर्षीं समृध्य पिके आलीं असती. कारण तो दरवर्षींच खपत असतो. श्रम करीत असतो. पावसानें खो दिला तर श्रम मशागत करूनही पिकाचें काय होईल ? खडकावर खत टाकून केलेल्या श्रमाला काय पिक येणार ? मुळांत जमीन चांगली असली पाहिजे. उत्तम पिक येण्यांत शेतकऱ्याचा जसा वांटा आहे तसा सूर्याचा ही आहे. पावसाचें सहाय्य आहे. जमीनीची मदत आहे. पिकावर या सर्वांचा हक्क आहे. शेतकरी व निसर्ग हे खरे हक्कदार. पण निसर्ग उदार आहे. तो कांहीं घेत नाहीं. त्यानें आपले सर्व हक्क शेतकऱ्यास दिले आहेत. म्हणून म्हणतात कसेल त्याची जमीन. निसर्गाला हें मान्य आहे. निसर्गाचें ऋण यज्ञरुपानें थोडे फार मानवानें फेडावे. पण मानवाचें काय सांगावें ?

## ( ६२ ) रंगसंगती

जागतिक चित्रांचें तें प्रदर्शन. त्याचेंही चित्र होतें. नशिब बेट्याचें. पहिलें बक्षिस मिळालें. वाहवा झाली. चित्रकार प्रसिद्धी पावला. धन्य झाली त्याची कला. तसें म्हटलें तर तो एक मामुली समजला जाणारा चित्रकार होता. चित्र तें काय ! अगदीच साधे होतें. कुठें स्त्री नाहीं कीं गुलाब फुललेलें नाहींत. एक साधें चित्र. इकडे तिकडे झाडेंपानें,वरती निळे आकाश, आकाशांत एकाद दुसरा रिकामटेकडा भटकणारा ढग, खालीं अर्ध्या विजारी व अर्धे शर्ट घालून विटी दांडू खेळणारी चार मुले. मैदानांत विटिदांडू खेळणारी मुलें आपण नेहमीं पहातो. पण या चित्रांतील आकर्षण कांहीं विलक्षण होतें. त्यांत रंग संगति होती. एकमेकांना

उठाव देणारे रंग मांडीला मांडी लावून बसले होते. योग्यजागीं योग्य रंग व तोही आजूबाजूच्या रंगाची शोभा वाढविणारा. रंग योजनेंत चित्रकाराचें कौशल्य होतें. यामुळें सर्व दृश्य मोहक, मनाला आनंद देणारे व आकर्षक वाटत होते. चित्रकाराप्रमाणे राष्ट्रीय नेत्यांनीं आपल्या कार्यांत रंगसंगती साधली तर किती छान होईल! योग्य जागीं योग्य माणसाची योजना करण्याची कीं जीमुळें आजुबाजूच्या माणसांच्या कार्याला उठाव येईल अशी कला नेत्यांजवळ असली पाहिजे. या योगें एकमेकांच्या कार्याला उठाव येऊन सर्व राष्ट्र अधिक कार्यक्षम व पराक्रमी होईल. पण अशाच कलाकारांचा नेमका अभाव आहे. रंग संगती साधण्यापेक्षां धनसंगती साधण्याकडे आमचें अधिक लक्ष. मग इतरांना आमचें राष्ट्रचित्र कसें आकर्षक व मोहक वाटणार?

## अनुसंधान राखण्यासाठीं झटावें

### श्री गोंदवलेकर महाराजांची शिकवण

[ अनुसंधान म्हणजे अखंड चिंतन. अनुसंधानांतून ध्यानावस्था प्राप्त होते. अनुसंधान पक्कें झालें कीं सहजसमाधींत राहतां येतें. व्यवहार करीत असतां आपलें अनुसंधान न चुकूं देणें ही साधकाची खरी करामत आहे. तें टिकविण्या-साठीं कशाचीहि मदत घ्यावी व कांहींहि सोडण्यास तयार व्हावें. अनुसंधान हें मंगलांत मंगल व पवित्रांत पवित्र आहे. ]

१ अखंड राखावें अनुसंधान । यापरता लाभ नाहीं नाहीं जाण ।।
२ न चुकूं द्यावें अनुसंधान । हीच परमार्थाची खरी खूण जाण ॥
३ जगन्नियंत्या प्रभूस करावें आपलें । बाकी कितीजण आले गेले ।
मनावर त्याचा न होऊं द्यावा परिणाम । कायम राखावें अनुसंधान ॥
४ अखंड राखावे समाधान । चुकों न द्यावें अनुसंधान ॥
५ एक परमात्म्याचें राखावें अनुसंधान । प्रपंचीं न चिकटूं द्यावें मन ॥
६ सत्य करावें भगवंताचें अनुसंधान जेणें दूर होईल मीपण ॥

७ म्हणून परमार्थाला एकच उपाय जाण । अखंड असावें अनुसंधान ॥
८ मंगलांत मंगल शुद्धांत शुद्ध जाण । एक परमात्म्याचें अनुसंधान ।
हें बीज लावलें ज्यांनीं । धन्य धन्य झाले जनीं ॥
९ अचूक प्रयत्न तोच जाण । प्रयत्नांत न चुकतें अनुसंधान ॥
१० बाह्य वेषानें कसाहि नटला । जगाला भुलविता झाला ।
तरी जोंवर नाहीं चित्त स्थिर । कसा पावेल रघुवीर ॥
११ म्हणून शक्य तों राखावें अनुअंधान ।
चित्तांत परमात्मा सांठवून जाण ॥
१२ मीपणाचा नाश । भगवंताचे अनुसंधानाशिवाय घडत नाहीं ।
हा ठेवावा विश्वास । श्रीराम कृपा करील खास ॥
१३ मी माझें म्हणून सर्व कांहीं करीत जावें ।
परी भगवंतापासून चित्त दूर न करावें ॥
१४ मारुतिरायाचें घ्यावें दर्शन । अभिषेकानें घालावें स्नान ।
त्याच्याच कृपेनें राखावें अनुसंधान ॥
१५ लोभ्याचे चित्तीं धन । तैसें राखावें अनुसंधान ॥
१६ शक्य तों भगवंताचें राखावें अनुसंधान । जो आनंदाचें निधान ॥
१७ दूर गेला प्राणी । परत येण्याची वेळ ठेवी मनीं ॥
१८ तैसें राहाणें आहे जगांत ।
मी परमात्म्याचा होण्याचा ठेवावा हेत ॥
१९ म्हणून न सोडावें अनुसंधान ।
कशापेक्षांहि जास्ती करावें जतन ॥
२० शक्य तों असावें अनुसंधान । त्यांत अणुमात्र नसे विघ्न जाण ॥
२१ शक्य तों राखावें अनुसंधान । जेणें सदाचरणाकडे लागेल वळण ॥
कोणाचेंहि न दुखवावें अंतःकरण । व्यवहार करीत असावा जतन
२२ व्यवहारांतील मान अपमान । हे टाकावे गिळून ।
अखंड राखावें रामाचें अनुसंधान ॥

# स्वामी चिदानंद

*

## एका उज्वल जीवनाचा अल्प परिचय

लेखक : **पु. बा. कुळकर्णी**

*

हृषिकेश येथें स्वामी शिवानंदजी यानीं स्थापन केलेल्या डिव्हाईन लाईफ सोसायटी या जगप्रसिद्ध संस्थेचे सध्यांचे अध्यक्ष स्वामी चिदानंद हे योग व अध्यात्मविद्येंत फार पुढें गेलेले थोर पुरुष आहेत. जगप्रसिद्ध म्हणून ज्या संस्थेचा येथें उल्लेख केला त्या संस्थेंत पद्धतशीर योगविद्येचें व अध्यातमाचें शिक्षण दिलें जातें. ज्यांना आपल्या जीवनांत दिव्यत्व आणायचें आहे ते व्याच देशांतील नव्हे तर जगांतील निरनिराळ्या देशांतील लोक त्या संस्थेंत दाखल होण्यासाठीं हृषि-केश येथें येत असतात.

स्वामी चिदानंद यांचा येथें परिचय करून घ्यावयाचा आहे. त्यांचें पूर्वाश्रमांतील नांव होतें श्रीधरराव. त्यांच्या वडिलांचें नांव होतें श्रीनिवास आणि आईचें नांव होतें सरोजिनी. श्रीनिवास राव हे एक बडे जमीनदार होतें. त्यांच्या मालकीचीं कांहीं गांवें होतीं व कांहीं वाडेही होते. घरांत राजेशाही थाट व रहाणी. कोणत्याही बाबतींत कमरता नव्हती. खुशाल खावें-प्यावें व चैन करावी. परंतु त्या सुखासीन जीवनांत श्रीधरला बाळपणापासून गोडी वाटत नव्हती.

### बालपणीं सज्जन सहवास

वयाच्या आठव्या वर्षापासून म्हणजे चांगलें समजायला लागल्यापासून श्रीधरराव एका वडीलधाऱ्या सज्जन पुरुषाच्या सहवासांत आले. ते होते त्याच्या आजोबांचे मित्र. नाव अनंतय्या. रामायण व महाभारत हे होते त्यांच्या आवडीचे ग्रंथ. त्यामधील गोष्टी अनंतय्यानीं श्रीधरला भावनावशतेनें सांगाव्या व श्रीधरनें त्या मोठ्या उत्कंठेनें ऐकाव्या. त्या गोष्टींची सदैव त्यांना तहान लागलेली असायची. मोठा होण्यासाठीं तप करावें लागतें; या जगांत देवाच्या भेटीइतकें दुसरें सुख कोणत्याही गोष्टींत नाहीं. प्रत्येकाचें तेंच ध्येय असावें. त्यासाठीं जगायचें वा मरायचें.

श्रीधरच्या मनावर हें ध्येय बालवयांतच अशा रीतीनें बिंबलें गेले. त्याच्या चुलत्याचें नांव होतें कृष्णराव. दैवयोग असा कीं तेही निवृत्तिमार्गी होते. 'देवाचिया भेटीसाठीं पडाव्या जिवलगांच्या तुटी ' असें मनापासून मानणारे होते. आपल्या या पुतण्याबद्दल व त्याच्या वृत्तीबद्दल त्यांना फार आदर वाटायचा. त्यानीं त्याला शक्य तेवढें उत्तेजन द्यावें. श्रीधर अध्यात्ममार्गी आहे. त्याचें मन सुखोपभोगांत रमत नाहीं याचें त्यांना कौतुक वाटायचें.

## बायबलचा अभ्यास

श्रीधरचा जन्म १९१६ सालीं झाला. त्याचें प्राथमिक शिक्षण मंगलूर येथें झालें. नंतर इंग्रजी शिक्षणासाठीं तो मद्रासला गेला. हायस्कूलमध्यें एक हुषार विद्यार्थी या नात्यानें त्यानें नाव मिळविलें. विद्यार्थी व शिक्षकवर्गांत तो सर्वांचा आवडता झाला.

१९३६ सालीं श्रीधर पदवी शिक्षणासाठीं लायोला महाविद्यालयांत जाऊं लागला. ती ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं चालविलेली नामवंत संस्था आहे. त्या संस्थेंत अर्थात्‌च जीझसख्राईस्टचें प्रस्थ भारी. आणि तें योग्यच होतें. तेथें श्रीधरनें बायबलचा अभ्यास कसून व भक्तिभावानें केला. त्याला श्रीकृष्ण व ख्राईस्ट हे एकच आहेत असें वाटूं लागलें. त्यांत त्याला बिलकूल अंतर दिसेना. वेद उपनिषदें व बायबल हीं त्याला एकच आहेत. वेगळ्या स्वरूपांत एकच शिकवण देण्यांत आली आहे हें त्यानें जाणलें.

## दोन कौटुंबिक गुण

श्रीधरच्या कुटुंबांत प्रामुख्यानें दोन गुण परंपरेनें चालत आले होते. सेवाभाव व परोपकार हेच ते दोन दैदिप्यमान गुण होत. त्या सद्गुणांचा परिपोष श्रीधरच्या ठायीं स्वाभाविकपणें होऊं लागला होता. सेवेसाठीं व परोपकारासाठीं आपला जन्म आहे असें श्रीधर मानीत असे व आलेली संधी वायां जाऊं देत नसे. परोपकारांत व दुःखितांची सेवा करण्यांतच जीवनसाफल्य आहे असें तो मानीत असे.

सेवा करायची, पण कोणाची ? ज्यांना तिची आत्यंतिक जरूरी आहे त्यांची. असे कोण ? महारोगी ! 'ज्यासी आपंगिता नाहीं त्यासी धरी जो हृदयीं'. त्याच वर्गांतील लोकांना आपण जवळ करायचें व त्यांची सेवा करायची, हें उच्च ध्येय स्वतःपुढें ठेवतांना त्यानें स्वतच्या जिवाचें काय होईल याची तमा बाळगली नाहीं.

## महारोग्यांची सेवा

श्रीधरचें वास्तव्य होतें त्या वाड्यामागें किती तरी जमीन मोकळी पडलेली होती. तेथें त्यानें महारोग्यांसाठीं अनेक झोपड्या बांधून घेतल्या व त्यांची तेथें सोय लावून त्याबरोबर आपल्या सेवानिवृत्तिचीही त्यानें चांगली सोय लावून घेतली. महारोगी हे श्रीधरला रोगी वाटत नसत. नारायणाचीं तीं विविध रूपें आहेत. त्यांची सेवा म्हणजेच भगवंताची सेवा. आपल्या जीवनाचें सार्थक त्याच सेवेनें आहे. अशी त्याची दृढ श्रद्धा होती. आणि त्या श्रद्धनें तो अहर्निश महारोग्यांत वावरत होता.

त्याची ही कीर्ती ऐकून व त्यानें आश्रयस्थान निर्माण केल्याचें समजून आसपासच्या गावांतून महारोगी तेथें येऊं लागले. श्रीधरचा दरवाजा त्यांच्यासाठीं सदासर्वकाळ खुला होता. त्यानें कोणालाही नको म्हटलें नाहीं. देवाला नको येऊं असें कोण म्हणेल का ?

या रोग्यांची सेवा करतांना श्रीधर कधीं कंटाळला नाहीं. त्या सेवेंत त्याला वेळेचें व खाण्यापिण्याचेंही भान रहात नसे. रोग्यांची सेवा प्रथम. मग बाकीचे व्यवहार असा होता त्यांचा खाक्या.

श्रीधरचें लक्ष केवळ मानव जातीकडे होतें असें नाहीं. त्याला माणसांत व त्याचप्रमाणें पशुपक्षांतही देव दिसत असे. त्यांच्याशींही तो त्याच सेवाभावानें वागत असे. जनावरांशीं निर्दयपणें वागणें त्याला मुळींच खपत नसे. त्याचा प्रतिकार करण्यासाठीं तो एकदम पुढें सरसावत असे.

## सरकारला जाणीव

श्रीधरपंतानीं महारोग्यांची अनन्यभावें सेवा चालविली आहे याची जाणीव आस्ते आस्ते मद्रास सरकारलाही झाली. आणि कां होऊं नये ? महारोग्याच्या कल्याणाच्या दृष्टीनें सरकारनें 'लेपर वेल्फेअर असोसिएशन' स्थापन केली होती. त्याचें प्रथम उपाध्यक्षपद व नंतर अध्यपक्षदही त्यांना देण्यांत आलें. परंतु श्रीधरपंतांना कोणतेंहीं पद नको होतें. त्यांना पाहिजे होती सेवा. तेंच होतें त्यांचें सर्व श्रेष्ठ पद. केवळ सरकारचा आग्रह म्हणून त्यानीं तें पद स्वीकारलें. केवल भिडेखातर !

रामनामाचा सदासर्वकाळ जप हें त्यांचें एक प्रमुख व्यसन होतें. त्यांत दिखाऊपणा मुळींच नव्हता. इतरांनीही रामनामाचा सतत जप करून जीवनंदाच उपभोग घ्यावा असें त्यांना मनापासून वाटत असे व जो भेटेल त्याला

रामनामाची दीक्षा देत असत. रामनाम हें सर्वकाळीं तारक आहे अशी त्यांची बालपणापासून श्रद्धा होती. उत्तरोत्तर ती बळावत गेली. लहान वयांतही आपल्या स्नेही सोबत्यांत ते रामनामाचा प्रचार करीत असत. ज्यांच्या दैवानें त्यांचें म्हणणें ग्राह्य वाटत असे ते त्या मार्गानें जात असत. सर्वांची धारणा कांहीं एकसारखी नसते. श्री योगेश या नावाचे त्यांचे एक मित्र होते. त्यांची होती रामनामावर संपूर्ण श्रद्धा. ते श्रीधरपंतांना आपला गुरु मानीत असत. सतत बारा वर्षें त्यानीं रामनामाचा जप अनन्यभावें चालू ठेविला होता. योग्यवेळीं त्याचें फळ त्यांना मिळालें. श्रद्धा पाहिजे, सातत्य सांभाळतां आलें पाहिजे ही सुद्धां एक प्रकारचां तपस्या आहे, नाहीं का?

बालपणापासून श्रीरामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांच्याबद्दल त्यांना अत्यादर वाटत असे. त्यानीं दिलेल्या उपदेशानुसार वागणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे, असें ते मानीत असत. मद्रास येथील श्रीरामकृष्ण मठाशीं त्यांचा अत्यंत निकट संबंध होता. साधुसंतांबद्दल बालपणापासून त्यांना प्रेमादर वाटत असे.

## संसारावर आसक्ति नव्हती

१९२६ सालपर्यंतचा श्रीधरपंताचा कार्यक्रम अशारितीनें चालू होता. वयाला वीस-एकवीस वर्षें होऊन चुकलीं होतीं. संसारावर व सभोंवारल्या सुखोपभोगांपरील आसक्ति साफ आटून गेली होती. आणि एके दिवशीं ते घर सोडून कुठें तरी न सांगतां निघून गेले. वडिल मंडळीनीं चारी बाजूंस तपास सुरु केला. शेवटीं तिरुपती डोंगरावरील मंदिरापासून कांहीं अंतरावर असलेल्या एका साधूच्या आश्रमांत ते सांपडले. त्यांची समजूत घालण्यांत आली व त्यांना घरीं आणण्यांत आलें.

श्रीधरपंतांना आईवडिलांचा, नातलगाचा, मित्रांचा व घरादाराचा एक दिवस कायमचा निरोप घ्यायचा होता. त्याचेंच हें पूर्वचिन्ह होतें. घरीं आले ते कोणाचेंही मन दुखवूं नये या हेतूनें. अंतःकरणांत वैराग्य बाणलें होतें. पुन्हां योग्य संधी पाहून सवांचा निरोप घ्यायचा हें निश्चित झालें होतें.

## जरूर ती तयारी

श्रीधरपंत घरीं आले ते घरच्या व्यापांत अडकून रहाण्यासाठी आले नाहींत. त्यांना घरादाराचा कायमचा त्याग करण्यासाठीं जरूर ती तयारी करावयाची होती. बंधनें तोडायची होतीं. पुढील मार्ग धीरोदात्तपणें चोखाळण्यासाठीं

शक्य व जरूर तें कार्य उरकायचें होतें. त्यांना उतावळेपणानें वागायचें नव्हतें. घरीं आले ते तेथें ठीक सात वर्षे स्थीरावले. घरीं आले म्हणून काय झालें ? आपल्या ध्येयाचा विसर त्यांना क्षणभरही पडला नाहीं. 'जेथें जातों तेथे, तूं माझा सांगाती.'

घरीं आले तरी रुग्णांची सेवा, दानधर्म, नामसंकीर्तन व त्याचा प्रचार वगैरे सर्व गोष्टी दुप्पट उत्साहानें चालू होत्या. घरीं येऊन ते सर्वपरीनें संन्यस्त वृत्तीनें वावरूं लागले. अक्षरशः संन्यासधर्माचें आचरण त्यानीं सुरू केलें. त्यांचा आहार अत्यंत साधा व जरूरीपुरता होता. अंगावर वस्त्र केवळ नावापुरतें! घरांत रोज पक्वान्नें शिजत होतीं; परंतु त्यांच्याकडे ढुंकूनही पहायचें नाहीं. घरांत कपडालत्ता लागेल तसला व विपूल होता; परंतु आपल्यासाठीं केवळ एक लहानसा पंचा! धार्मिक ग्रंथांचें वाचन, मनन सतत चालू. घरांत गाद्या, पलंग असले तरी भूमीवर एखादी चटई टाकून झोपायचें.

सर्व प्रकारच्या मुबलक साधन सामुग्रीनें ओतप्रोत भरलेल्या वाड्यांत राहून एखाद्या जंगलांतील झोपडींत राहिल्याप्रमाणें जीवन घालवायचें हें सहज-सुलभ का आहे ? त्यासाठीं मनावर केवढा ताबा असावा लागतो ?

वर्षानुवर्ष प्रगती चालू होतीं. ही सात वर्षें घरीं राहूनही कडक तपश्चर्येंत गेलीं.

## गृहत्यागाचें वर्ष

१९४३ साल उजाडलें. तें गृहत्यागाचें वर्ष होतें. हृषीकेश आश्रमाचे संस्थापक स्वामी शिवानंद यांच्याशीं पत्रव्यवहार सुरू झाला. त्यानीं कांहीं प्रश्न विचारले होते. त्यांचें समाधानकारक उत्तर गेलें. ताबडतोब आश्रमांत दाखल व्हा असें उत्तर आलें. ज्याची श्रीधरराव मार्गप्रतिक्षा करीत होते तो गृहत्यागाचा दिवस उजाडला.

आश्रमांत दाखल झाल्यानंतर प्रथमतः त्यानीं तेथील रुग्ण सेवेची व औषधोपचाराची जबाबदारी स्वीकारली. त्या आश्रमांत लोककल्याणाचीं नानाविध कामें सतत चालू असतात. त्यांच्या हाताला यश होतें. रोग्यांची सेवा हें तर त्यांचें अत्यंत आवडतें कार्य. तें कार्य ते मन लावून करूं लागले. स्वामी शिवानंद यांचें त्यांच्या सेवाकार्याकडे बारकाईनें लक्ष लागून राहिलें होतें. ज्या प्रकारच्या सेवाभावी माणसाची त्यांना जरुरी होती ती व इतर सर्व अपेक्षा भागविणारी व्यक्ती श्रीधरच्या रूपानें त्यांच्याजवळ आली होती. त्यांच्यावर कोणतेही काम सोपवा.

प्रत्येक बाबतींत तरबेज. वर्ग चालवायला सांगा, व्याख्यान द्यायला सांगा, परदेशी पाहुण्यांचें किंवा तेथें आलेल्या कोणाचेंही शंकानिरसन करायला सांगा, मासिकांत लेख लिहायला सांगा किंवा दुसरी कोणतीही जबाबदारी सोपवा, प्रत्येक बाबतींत कल्पनातित समाधान ! असे होते गुण त्यांच्या अंगीं !

## स्वामी शिवानंदांचे सहकारी

स्वामी शिवानंदानीं तेथें योग वेदांत महाविद्यालयाची स्थापना केली तेव्हां श्रीधरपंतांची योग्यता लक्षांत घेऊन त्या महाविद्यालयाचें उपकुलगुरूपद मोठ्या विश्वासानें त्यांना दिलें व त्यांना राजयोगाचे प्राध्यापक नेमिलें. महर्षि पातंजलीचीं योगसूत्रें शिकविण्यांत त्यांचा हातखंडा होता. देशी व परदेशी योगाभ्यासी त्यांच्यावर निहायत खूष होते.

आश्रमांत रहायला आल्यास एखादें वर्ष लोटलें असेल नसेल. त्या काळांत त्यानीं स्वामी शिवानंदाच्या जीवन कार्याचा यथायोग्य परिचय करून देणारा 'लाईट फाऊंटन' हा चरित्रपर महाग्रंथ लिहून पूर्ण केला. कामाचा उरक जसा दांडगा त्याचप्रमाणें दृष्टि चोखंदळ. आरपार पाहूं शकणारी व हृदयभेदी. त्यांच्या या ग्रंथानें मोठीच मानमान्यता मिळविली आहे. गुरुदेव शिवानंद त्या ग्रंथाला उद्देशून एकदां म्हणाले होते कीं, 'शिवानंद एके दिवशीं या जगाचा निरोप घेऊन जाईल परंतु 'लाईट फाऊंटन' हा ग्रंथ मात्र अमरत्व मिळवील' आणि झालें आहे तसेंच.

श्रीधरपंतांचा उत्साह दांडगा होता. किती तरी मोठ्या जबाबदाऱ्या त्यानीं आपल्या शिरावर घेतल्या होत्या. आणि त्या पार पाडण्यासाठी ते अहोरात्र झटत होते. त्यांतच त्यानीं मोठ्या हौसेनें गुरूदेव शिवानंद यांच्या मार्गदर्शनाखालीं 'योग म्युझियम' स्थापन केला. योगाभ्यासाला लागणारीं जरूर तीं सर्व साधनें, चित्रें, नकाशे वगैरे तेथें संग्रहीत करून ठेवण्यांत आले आहेत.

## डिव्हाईन लाईफ सोसायटी

'डिव्हाईन लाईफ सोसायटी' ही गुरूदेव शिवानंदजी यानीं स्थापना केलेली व जागतिक कीर्तीची एक संस्था आहे. तिचे सेक्रेटरी होते श्रीनिजबोधजी. ते सेवानिवृत्त झाले तेव्हां शिवानंदांनीं त्या महत्वाच्या जागीं श्रीधरपंतांची योजना केली. तीं सूत्रें हातीं घेतांच त्या संस्थेच्या कार्यांत त्यानीं नवचैतन्य निर्माण केलें. नावाप्रमाणें करणी हातून घडली तरच तें नाव. 'डिव्हाईन लाईफ' —दैवी जीवनाची जोड करून देणारी संस्था आणि त्या नावाप्रमाणें जे जे कोणी संस्थेशीं संलग्न होतील त्यांना त्यांना दैवी जीवनाचा लाभ घडावा यासाठीं ते मनोभावें झटूं लागले. संस्थेचा दर्जा वाढूं लागला.

## स्वामी चिदानंद

ता. १० जुलै १९४९ हा दिवस श्रीधरपंतांच्या जीवनांत आत्यंतिक महत्त्वाचा व मोलाचा आहे. त्यदिवशीं श्रीधर हें नाव मागें पडलें व त्याची जागा स्वामी चिदानंद या मधूर नावानें पटकाविली. तो गुरुपौर्णिमेचा पवित्र दिवस होता. त्यादिवशीं गुरुदेव शिवानंदजी यानीं त्यांना दीक्षा दिली व त्यांना तें नामाभिधान बहाल केलें.

स्वामी चिदानंद हे एक पट्टीचे संघटकही आहेत. आपल्या गुरुदेवाबरोबर त्यानीं भारतभर दौरा काढला व 'डिव्हाईन लाईफ' सोसाइटीच्या शाखा ठिकठिकाणीं स्थापन केल्या.

## युरोपअमेरिका दौरा

१९५९ सालीं स्वामी चिदानंद हे गुरुदेवांच्या प्रेरणेनें अमेरिकेच्या व इतर युरोपीय देशांच्या दौऱ्यावर निघाले. अमेरिकेंतिल लोकांनीं त्यांचें उत्तम प्रकारें स्वागत केलें व त्यांच्या आगमनाचा शक्य तेवढा फायदा करून घेतला व दिलाही. युरोप व अमेरिका या देशांतील ज्या ज्या भागांत ते गेले तेथें तेथें त्यानीं भारताचें नाव उज्वल केलें, या जागतिक दौऱ्यावरून ते १९६२ साली स्वदेशीं आपल्या आश्रमांत परत आले व पूर्ववत् आश्रमाचीं सूत्रें हाताळू लागले.

त्या दौऱ्यावरून परत आल्यानंतर दक्षिण भारताचा दौरा त्यांनीं केला. तो कांहीं महिन्यांचा होता. दक्षिणेकडील सर्व क्षेत्रांना व मंदिरांना त्यानीं भेटी दिल्या. आश्रमाच्या कार्याचा प्रचार करून त्याचें क्षेत्र वाढविलें.

## अखेरचा दहा दिवसांचा सहवास

हा कार्यक्रम संपवून ते आश्रमांत यायला निघाले. आश्रमांत आल्यानंतर गुरुदेवांचा सहवास त्यांना अवघा दहा दिवस लाभावयाचा होता.

जुलै १९६३ मध्यें गुरुदेव शिवानंदजी यानीं महासमाधि घेतली. आणि आगष्ट १९६३ मध्यें स्वामी चिदानंद यांची सर्वानुमते डिव्हाईन लाईफ सोसायटी या महान् संस्थेचे माननीय अध्यक्ष या नात्यानें निवड झाली. तसेंच योग वेदांत फॉरेस्ट महाविद्यालयाचेही ते कुलगुरू झाले.

एका थोर महाभागाचा जीवनारंभ कसा झाला आणि स्वतःच्या कर्तबगारीयच उद्योगाच्या व एकनिष्ठेच्या बळावर तो महाभाग कोणत्या पदाला जाऊन पोहोंचला हे विचारपूर्वक पहाण्यासारखें आहे.

# साक्षात्कार

लेखक—**केशव कृष्ण प्रधान**

## प्रकरण १ लें

"नीलाकाश पिवळ्या गर्द रंगांनीं एकाएकीं भरून गेलें. भगवान श्रीसूर्य-नारायणाचा पृथ्वीकडे झेपावणारा प्रत्येक किरण सोनेरी चकचकीत बनून सर्व बाजूंनीं जेथें समुद्रकिनाऱ्यावर मी विनम्र हात जोडून प्रभूला आळवीत उभा होतों तेथें मला लपेटून परावर्तित होऊं लागला. या दिव्य प्रकाशानें माझे नयन अर्धोन्मीलित झाले. पिवळा पीतांबर नेसलेली" आपल्या दिव्य प्रकाशानें क्षणभर डोळे दिपवून टाकणारी, वैजयंतीमाला धारण केलेली, सुवर्ण—मुकुट कुंडले भूषित अशी वासुदेवाची सुंदर शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेली मूर्ति आपले कमल—नयन प्रेमोद्गारानें मजवर रोखून मजकडे मधुर हास्य करीत उभी असलेली मला स्पष्ट दिसली. माझे सर्वांग पुलकित झाले. मी सद्‌गदित वाणीनें 'प्रभो, प्रभो' असें म्हणतच त्या ठिकाणी एका दिव्य समाधि—स्थितींत गेलों. त्या बेभान मस्त स्थितींत मी किती वेळ होतों तें माझें मलाच कळलें नाहीं. परंतु त्यानंतर माझें जीवन अतिशय पवित्र, मंगलमय बनले व माझी बालपणापासून पवित्र विचार आणि वातावरणांत केलेली पूर्वतयारी आज फळास आली असें मला वाटलें"

एका साक्षात्कारी पुरुषाचें हें वर्णन वाचून मला पण कधींतरी असा सगुण साक्षात्कार होईल का? याचा सदैव ध्यास लागला. मी विचार करूं लागलों कीं, आमच्या धर्माचार्यांनी साक्षात्कार अतिशय उच्च मंगल पदावर अधिष्ठित केलेला आहे. खरा साक्षात्कार फार फार उच्च स्थितींत आहे. सर्व-साधारण माणसांना जवळ जवळ ती स्थिती प्राप्त होण्यासारखीच नाही. त्यासाठीं कितीतरी कष्ट करावे लागतात. सर्व विषयसुखांपासून मन मुक्त करावें लागतें ऐहिक सुखाची सर्वच इच्छा सोडून द्यावी लागते. एकमेव परमेश्वराचा ध्यास धरावा लागतो तेव्हा कोठें आपल्या पराकाष्ठेच्या प्रयत्नांनीं हा परमेश्वर. आपल्याला साक्षात्कार देतो. म्हणजे या ना त्या रूपानें प्रत्यक्ष आपल्यासमोर

उभा राहून आपले दर्शन देतो. श्रीसमर्थांनी, तुकाराम महाराजांनी सर्व संसार सोडून जंगलांत जाऊन परमेश्वराला आळविलें. परमेश्वराचे दर्शन होण्याकरिता कुणातरी गुरूकडून दीक्षा घ्यावी लागते. त्याने दिलेल्या मंत्राचा कोटी कोटी वेळा जप करावा लागतो, ब्रह्मचर्य पाळावें लागतें म्हातारपणी वानप्रस्थाश्रम पत्करावा लागतो. त्यासाठी काय करावें लागत नाही ? भगवीं वस्त्रें धारण करून संन्यास घ्यावा लागतो. एक ना दोन, कोण यातायाती या ! तेव्हां कुठे परमेश्वराचें दर्शन होतें. म्हणतात ना "चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे" तें खोटें आहे ? असा हा पवित्र मंगलमय साक्षात्कार माझ्यासारख्याला कसा होणार ?

तसें म्हटलें तर आमच्या घरचें वातावरण अत्यंत धार्मिक व मंगलमय असे. घरांतल्या सोप्यांत एका बाजूला मुद्दाम देवघरासाठी आमच्या वडिलांनी एक प्रशस्त देवखोली तयार करून घेतली होती. त्यांत आमच्या आईच्या आग्रहावरून एक सुंदर मोठा चांदीचा देव्हारा करून बसविला होता. तेथून उदबत्त्या कापूर ऊद धूप यांचा सुगंध सोपाभर पसरायचा. त्यांतच ताई—आक्कांनीं तोडून आणलेल्या ताज्या फुलांचा वास मिसळायचा व कसें स्वच्छ, पवित्र शुचिर्भूत वाटायचें. रोजच्या पूजेकरितां खास एका वयोवृद्ध तपस्वीसारख्या दिसणाऱ्या पुरोहितांची नेमणूक केली होती. ते अगदी वेळेवर पूजेसाठी येत. ते येण्याच्या अगोदरच माझी आई पूजेचें सर्व साहित्य अगदीं नीट बाजूच्या रंगीत पाटावर तयार करून ठेवायची. मी कधी कधी मोठ्या पहाटेस उठून आंघोळ करून, पूजेसाठी गंध उगळून ठेवीत असे. व मी आईला पूजेचे इतर साहित्य तयार करण्यास मदत करी. पण त्यासाठी मला प्रथम स्नान करावेच लागे. पारोशाने आई मला कधीहि ह्या साहित्याला हात लावूं देत नसे. आमच्या घरी सोवळ्या—ओवळ्याचें महत्व फार. त्यांतच आठवड्यातले तीन—चार दिवस आज काय सोमवार—श्रीशंकराचा वार म्हणून, आज काय गुरुवार—श्रीदत्तात्रेयांचा वार म्हणून तर कधी चतुर्थी म्हणून आई व आत्यांचे उपवास चालूच असत. तसें म्हटलें तर आमच्या घरी उपवास, व्रत—वैकल्यें सतत चालू असायची. आणि च्यातुर्मासांत तर कांही विचारूच नका. अशा तऱ्हेच्या धार्मिक घराण्यांत माझा जन्म झाला म्हणून मला मोठा अभिमान वाटायचा. आमच्या घरीं अतिथी माहात्म्य मोठें. एक माधुकरी मुलगा सतत जेवावयास असायचा. पाहुण्याचे तर

राहू द्या, परंतु दारावर भिक्षेसाठी आलेला एकही भिक्षेकरी कधींहि विन्मुख जात नसे. मला आठवते एक कोट–टोपी घातलेला व उपकरणे घेतलेला फारच सोज्ज्वळ दिसणारा हसतमुख तरुण भिक्षेकरी एकतारी व चिपळ्या घेऊन नेहमी आमचे घरी थेट आंतील चौकांत येऊन सुस्वरांत

"ज्याचे वंशी प्रभू देवनाम सेवा।
त्याचे वंशी हरि जन्म मला द्यावा॥

असें भजन म्हणत असे तेव्हां तर मला या शुचिर्भूत कुळांत जन्म झाल्याबद्दल धन्यता वाटत असे.

पुढे ताई व अक्का यांची लग्ने झालीं. या लग्नप्रसंगी पुरोहित वधूवरांमध्ये अंतरपाट धरून मंगलाष्टकें म्हणूं लागले कीं माझें शरीर एका दिव्य स्वर्गीय भावनेने पुलकित होई. विशेषतः आमच्या भरतखंडातल्या देवीस्वरूप नद्यांची 'गंगा सिंधु सरस्वती च यमुना' अशी एकामागून एक नांवे मंगलाष्टकांच्या दिव्य स्वरांत कानावर पडली की अशा पवित्र देशांत जन्म घेणारे तेहतीस कोटी लोक मला देवस्वरूप वाटत. सुरासुरांनी समुद्रमंथन करून एकामागाहून एक आकाशांत उडवलेल्या 'लक्ष्मी, कौस्तुभपारिजातकसुरा' वगैरे रत्नांचीं नांवे कानावर पडली की समुद्रमंथन प्रत्यक्ष डोळयांनी पाहाण्यास आपणही त्या पुरातन काळी तेथे हजर असलोच पाहिजे असे उगाचच वाटे. मंगलाष्टकांतील अतिशय आवडती माझी ओळ म्हणजे 'गोप-स्त्री परिवेष्टितो भुजगसा।' ही होय. ही ओळ पुरोहित म्हणत असताना यदुकुलभूषण मनमोहन श्रीकृष्ण गोपी मेळाव्यांत मला दिसत असे व श्रीकृष्णाबद्दल माझ्या मनांत अत्यंत नाजूक असे प्रेमभाव निर्माण होत असत.

बालपणी मनावर अशा तऱ्हेचे पवित्र संस्कार झाल्यामुळे–'बालपणीं बालांची कोमल तरुतुल्य बुद्धि वाकेल' या न्यायाने मला देवधर्म पुराणें, कीर्तने, देवदर्शन वगैरे गोष्टी म्हणजेच जीवनाचें सारभूत सर्वस्व वाटूं लागलें. जसजसा मी मोठा होऊं लागलों तसतसा अनुक्रमाने रामायण, महाभारत वगैरे धर्मग्रंथांत मला विलक्षण गोडी वाटू लागली. पुढे पुढे तर मारुतिस्तोत्र, रामरक्षा, शिवकवच, शिवलीलामृत यांच्या नित्य पठनामुळे या सर्व देवदेवता माझे रक्षण करण्यास तयार आहेत असे वाटून

एक जबरदस्त आत्मविश्वास निर्माण झाला. या दिव्य शक्तीविषयी अधिकाधिक समजून घेण्याच्या इच्छेने मी इतर धर्मग्रंथ वाचू लागलो. शांकरभाष्य, उपनिषदें, वेद वगैरे कठीण ग्रंथही जसे मला समजले तसे मी वाचले. त्यामुळे माझी परमेश्वर भेटीची तळमळ वाढूं लागली. परंतु त्या सर्व ग्रंथांतून असे लिहिलें आहे कीं परमेश्वर भेटण्यास प्रथम आत्मसाक्षात्कार व्हावा लागतो. 'अनुभवाशिवाय सर्व फुकट आहे, अनुभव मिळणें तर महाकठीण काम आहे; त्यासाठीं संसाराविषयी विरक्ती निर्माण झाली पाहिजे. माझ्या सर्व ईच्छा मला प्रथम मारल्या पाहिजेत वाईट इच्छा तर मुळीच असता कामा नये. माझें अंतर्बाह्य वर्तन तर शुचिर्भूत असले पाहिजे व माझ्या ठिकाणी परमेश्वराशिवाय दुसरा कोणताहि विषय असतां कामा नये. हें सर्व वाचून तें आपणास कसे जुळणार या विषयी मन साशंक होऊन मी त्यासंबंधी खोल विचार करूं लागलों.

शेवटीं आपले अंतर्बाह्य विचार व वर्तन शुद्ध राखण्याची या मार्गांत आत्यंतिक जरूरी आहे असा माझ्या मनाचा ठाम ग्रह झाला व त्याप्रमाणे वागावयाचे मी ठरविलें. रोज मोठ्या पहाटेस उठून मी आंघोळ करीं. देवाचीं स्तोत्रें म्हणे शक्यतो साधे स्वच्छ कपडे घाली. मी जसजसा मोठा होऊं लागलों तसतसा मला भोवतालच्या परिस्थितीमुळें या सर्वांत फरक करण्याचा मोह पडूं लागला. परंतु मी माझ्या मनाशीं ठरविलें की कांही झालें तरि फार फॅशनेबल कपड्यांचा मोह धरावयाचा नाहीं. आहार विहार माफकच राखायचा. सर्वांशीं नम्र भावाने वागायचे. विशेषतः स्त्रीवर्गाशी फारसा संपर्क येऊं द्यायचा नाही. लग्न करावयाचे नाहीं कडक ब्रह्मचर्य पाळायचें. कांदा, लसूण वगैरे मादक कामोत्तेजक पदार्थ वर्ज्य करायचे. सर्व स्त्रियांस मातेसमान मानावयाचे. दासबोध, ज्ञानेश्वरी, गीता यासारख्या धर्मग्रंथाचे सतत पठन करायचे व जितके म्हणून आत्मसाक्षात्काराला पोषक असे वागणे आमच्या धर्मग्रंथांतून सांगितलेलें आहे त्याचें तंतोतत पालन करावयाचें व त्यांत रतिभरसुद्धां चुकावयाचे नाही.

माझें सर्व शालेय शिक्षण आमच्याच गांवच्या हायस्कुलांत झालें. नंतर कॉलेजांत जाण्यासाठीं म्हणून मी पुण्यास गेलों. कॉलेजची वर्षें कशी हां हां म्हणतां निघून गेलीं तें कळलेंच नाहीं. मी पदवीधर झालों व नंतर नोकरीनिमित्त मुंबईला येऊन गिरगावांत एकटाच एक खोली घेऊन राहूं लागलों.

भोवतालचे जग झपाट्यानें पालटतच होतें. प्रत्येक प्रांतांत जुनी विचारसरणी मागें पडून तिची जागा नवीन पटकावीत मतप्रणाली होती. तशांत यंत्रयुग किती जलद भोवताली आपली किमया पसरवूं लागलें तें कळलेंही नाहीं. खेडीं शेतीच्या व्यवसायांत विशेष फायदा नाहीं, व इतरही म्हणण्यासारखे धंदे नाहींत म्हणून ओस पडूं लागलीं. खेड्यांतला व इतर लहान लहान गावांतला सर्व माणसांचा ओघ मुंबईसारख्या मोठ्या शहराकडे वाहूं लागला. शहरी जीवन म्हणजे आधींच राहण्याच्या जागेची टंचाई. रोजगारासाठीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत धांवपळ व धडपड. ट्रॅम, बस व आगगाडी या साधनांचा उपयोग केल्याशिवाय एका जागेवरून जरूर त्या दुसऱ्या जागेवर जाण्याची पंचाईत. एक ना दोन हजार भानगडी. कुंद हवेमुळें रात्रींची झोप धड लागली तरी मिळविलें. माझ्यासारख्या शुचिर्भूत स्वच्छ माणसाचा तेथे निभाव कसा लागणार ? रात्रीच्या जागरणामुळें माझा रोजचा पहाटे उठण्याचा नियम मात्र वारंवार मोडूं लागला उशीरा उठल्यानें लगेच कामास जाण्याची वेळ होई. संध्याकाळी कामावरून परत आल्यावर इतकें थकल्यासारखे वाटायचें कीं रोजचें वर्तमानपत्र वाचण्याची मारामार तर धार्मिक वाचन कोठून होणार ? बसमध्यें व आगगाडीत तर इतकी गर्दी व धक्काबुक्की कीं तेथें धड उभे राहण्यास जागा मिळणेही मुश्कील शहरांत तर मला अगदी गुदमुरल्यासारखे झालें. कुठें आमच्या गांवाचे शुद्ध, स्वच्छ वातावरण व कुठें हें शहरी वातावरण ! ती वांकण घेत गांवाला लागून गेलेली पवित्र नदी, तिच्या कांठचें तें शंकराचें मंदिर, तिथें चाललेला तो शंकराच्या नांवाचा पवित्र जप, अभिषेक करण्यास आलेली स्त्री-पुरुष मंडळी, आमची ती पळीपंचपात्री घेऊन सर्वांगाला भस्म नाहींतर कपाळावर गंधाचे पट्टे ओढून लगबगीनें जा-ये करणारी पुरोहित मंडळी. सर्वच कसें शुचिर्भूत व मंगलमय, इथें बघावें तर काय ! पुरुषांपेक्षां स्त्रियांचा भरणाच जास्त. त्यांत तोकड्या हातांचा ब्लाऊज घातलेल्या, लिपस्टिक व पावडरी लावलेल्या, बॉबकट् केलेल्या पारशी, ख्रिश्चन, यहुदी, हिंदू सर्वच जातीच्या महिला आपल्या अंगाला अंग घासून नाहींतर खुशाल धक्के मारून इतस्ततः फिरत असतात. कामाच्या घाईमुळे कसेबसे दोन घास पोटांत ढकलून मी कामावर जाई. दुपारी सणसणून भूक लागे. रस्त्यांतले भजी व दुकानांतले इतर तळलेले पदार्थ खावे लागत, ते

उन्मादक तर खरेच पण प्रकृति-स्वास्थ्यही बिघडविणारे. इथें नीट राहायचें तर पैसा मुबलक पाहिजे. लोकांची मोठमोठीं घरें, इमारती वगैरे पाहिल्या कीं वाटायचें आपलेंही इथें एखादे ऐसपैस घर असावें फार मोठी नाही पण जाण्या-येण्याच्या सोयीसाठी एक लहानशी मोटारगाडी असावी. मोठमोठ्या हॉटेलांत जाऊन चांगले चांगले पदार्थ खाण्यासाठीं खिशांत थोडाफार पैसाही खेळावा. त्याशिवाय नित्यबदलत्या फॅशनमुळें कपडेही व्यवस्थित व सुंदर असावेत. पण हें सर्व एकदम कसें जमणार ? असे म्हणत म्हणत उद्या नाही परवा नाही तेरावा दिवसामागून दिवस महिन्यामागून महिने वर्षामागून वर्षे गेली परंतु म्हणण्यासारखा विशेष असा आधिक फरक कांही पडला नाही. उलट महागाई वाढतच होती, तिच्याबरोबर माझ्या वैयक्तिक गरजाही वाढत होत्या. आई-वडिलांचे गांवाहून लग्न करून घेण्याबद्दल सतत टुमणे चालूच होते. मलाही एक सुंदर फक्कडशी बायको असावी असें वाटू लागलें. आता देव आत्मसाक्षात्कार धार्मिक वाचन सर्व मागें पडलें होते. शुद्ध शुचिर्भूत वर्तन थोडे कठीण झालें. त्याबद्दल फक्त "लोकां सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण" अशी स्थिती झाली. चांगल्या विचारांऐवजी लोभ, मत्सर, असूया, निंदा यांनी मनांत ठाणें मांडून धुमाकूळ माजविला होता. अशा स्थितींत आत्मसाक्षात्कार होण्याची शक्यता तर पार नाहींशी झाली होती.

ग्रंथ-परिचय---

# क्षेमकुशल

लेखकः —म. भा. माईणकर
प्रकाशकः — मो. शं. कुलकर्णी
भारतीय प्रकाशन मंदिर, मुंबई—४.
[ मूल्य दोन रुपये ]

श्री. म. मा. माईणकर हे आतां कथालेखनांत सराईत झालेले आहेत. प्रस्तुत कथासंग्रह हा त्यांचा तिसरा कथाग्रंथह आहे. 'झांजर' 'वासंती' या त्यांच्या पूर्वीच्या कथासंग्रहांनीं लोकप्रियता मिळविली आहे. त्याचप्रमाणें हाही संग्रह लोकादरास पात्र होईल असें वाटतें.

श्री. माईणकर यांचा व्यवसाय शिक्षकाचा. शिक्षकी जीवनांत अनेक वर्षें घालविल्यामुळें व त्या जीवनांत बरे वाईट चटके बसल्यामुळें त्याचप्रमाणें सूक्ष्म अवलोकन शक्तीमुळें त्या जीवनांतील तसेंच सर्वसामान्य कारकुनी जीवनांतील बारकावे त्यांना सहज टिपतां आले.

या संग्रहांत एकंदर सहा लघुकथा व तीन शब्दचित्रें यांचा समावेश करण्यांत आला आहे. प्रत्येक लघुकथा वाचीत असतां स्वानुभवी नि सहज कथन पद्धतीमुळें वाचक तिच्याशीं समरस होऊन जातो. शिवाय भाषा अत्यंत साधी आहे. कारकून, शिक्षक व शिक्षकिणी यांच्या जीवनांतील कांहीं प्रसंगांचें चित्रण परिणामकारक आहे.

सर्वसामान्यांचें जीवन समरसतेनें व कुशलतेनें रेखाटणें व वाचकांपुढें कांहीं ना कांहीं उच्च आदर्श ठेवणें हें लेखक या नात्यानें कथालेखक श्री. माईणकर यांचें नेहमीचें धोरण आहे. या संग्रहांत तें धोरण चांगलें साध्य झालें आहे.

विद्यार्थ्यांच्या व तरुण तरुणीच्या हातांत अशाप्रकारचें सोज्ज्वळ व परिणामीं हितकारक असें वाङ्मय पडणें सध्यांच्या काळांत अत्यंत जरूर आहे. शिक्षणसंस्थांनीं अशा वाङ्मयास जितका हातभार लावतां येईल तेवढा लावणें जरूर आहे, असें आम्हांला वाटतें.

× × × × × ×

# तीन पुरुषोत्तम

लेखक–**वि. स. गवाणकर,**

प्रकाशक–निर्णयसागर बुक प्रकाशन, मुंबई २.

किं. एक रुपया.

राजा राममोहन रॉय, कविवर्य रवींद्रनाथ टागोर व महात्मा गांधी यांचें भारताच्या घडवणुकीच्या दृष्टीनें ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. भारताचा सांस्कृतिक, सामाजिक नि राजकीय इतिहास घडविण्यांत या तीन पुरुषोत्तमांचें स्थान अत्यंत आगळें व असामान्य आहे. या थोर तशाच अतुलनीय व्यक्ति आहेत. आपल्या मातृभूमीची अनन्यभावें सेवा व तिचें पुनरुत्थान हेंच त्यांच्या जीवनाचें ध्येय होतें. तें साध्य करून घेण्यासाठीं ते तळमळीनें व स्वार्थ-त्यागपूर्वक कसकसे झटले, त्यापायीं त्यांना हालअपेष्टांतून कसें जावें लागलें व कशाचीही तमा न बाळगतां आपल्या ध्येयसिद्धीसाठीं ते कसकसे झगडले हा सारा इतिहास हृदयंगम तसाच स्फूर्तिदायक आहे. अशा ध्येयवादी व निष्ठासंपन्न महाभागांचीं जीवनचरित्रें बालवाचकांच्या वाचनांत येणें ही संस्कारांच्या नि शैक्षणिक दृष्ट्या फार महत्त्वाची गोष्ट आहे.

लेखक श्री. गवाणकर यांनीं ६४ पानांत अत्यंत सोप्या व परिणामकारक भाषेंत वरील तीन पुरुषांच्या जीवनकार्याचा जरूर तेवढा परिचय करून दिलेला आहे.

मुलांबाळांपुढें उच्च आदर्श ठेवणें हें पालकांचें त्याचप्रमाणें शिक्षकांचें पवित्र कर्तव्य आहे. थोरामोठ्यांच्या चरित्रांचें वाचन हें नेहमींच स्फूर्तिदायक असतें. मुलांच्या हातांत. अशा प्रकारचें वाङ्मय जितकें पडेल तितकें थोडेंच होय. श्री. गवाणकर हे एक सराईत नि बालमानस जाणणारे लेखक आहेत; तेव्हां त्यांच्या बाबतींत विशेष लिहिण्याची जरूरी नाहीं.

निर्णयसागरची छपाई आणि त्याला सुंदर मुद्रिकांची जोड मिळालेली; त्यामुळें त्या मुद्रणालयांतील पुस्तकें प्रथमदर्शनींच हातीं घ्यावीं असें वाटतें. आज सुंदर स्वरूपांत छापलेल्या बालवाङ्मयाची फार जरूरी आहे आणि हें लक्षांत घेऊन निर्णयसागरनें आतांपर्यंत बालवाङ्मयांत उपयुक्त भर घालणारीं सुमारें वीस पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत, ही गोष्ट अभिनंदनीय आहे.

# उंदराचा पराक्रम

लेखिका-**श्रीमती सुनंदा दिगंबर पाटील बी. ए.,**

प्रकाशक-निर्णयसागर बुक प्रकाशन, मुंबई २. **किं. ७५ पैसे.**

मुलांना जनावरांच्या, पशुपक्ष्यांच्या गोष्टी मनापासून आवडतात हें ओळखून इसापनें अशा शेंकडों गोष्टींनीं संपन्न अशी इसाप–नीति बालवाचकांपुढें ठेविली. शेंकडों वर्षें लोटलीं तरी जगांतील सर्व भाषांतील वाङ्मयांत इसापच्या कथा आजही बालकप्रिय होऊन राहिल्या आहेत. इसापच्या सुरम्य कथा वाचल्या नाहींत असा मुलगा सांपडणें कठीण आहे.

त्याच धर्तीवर परंतु कथालेखनाचें आधुनिक तंत्र हाताशीं धरून सुनंदा ताईनीं सोप्या व गोड भाषेंत लिहिलेल्या ह्या सात कथा या छोटेखानी व सचित्र पुस्तकांच्या द्वारें बालवाचकांस सादर करण्यांत आल्या आहेत. सिंह, वाघ, उंदीर, चिमणी, ससा, सर्प, हत्ती, कोल्हा अशा बहुतेक महत्त्वाच्या पशुपक्ष्यांच्याद्वारें बालवाचकांच्या गळीं उतरेल अशा पद्धतीनें बोधामृत पाजण्यांत आलें आहे. बोध व मनोरंजन हे दोन्ही हेतू साध्य व्हावे हा हेतू लेखिकेनें दृष्टीसमोर ठेवला असून तो उत्तम प्रकारें साध्य झाला आहे. हेंही एक निर्णयसागर प्रकाशन आहे. त्यामुळें बाह्यांग व सजावटीबद्दल वेगळें लिहिण्याची जरूरी नाहीं.

---


# मुफ्त उपकार।
# टेरीलीन पीस

॥ मन पसन्द रंगों में ॥

( पैंट, कमीज या बुशशर्ट के लिए )

एक पीस का मूल्य केवल १४) रुपये डाक खर्च अलग। पूरे सूट के लिए केवल २५) रुपये। पैकिंग और डाक खर्च बिलकुल मुफ्त। एक पीस मंगाने पर एक फाउन्टन पेन और पूरे सूट का पीस मंगाने पर तीन फाउन्टेन पेन उपहार में मुफ्त। पोशाक के प्रेमी आज ही वी. पी. पार्सल के लिए लिखें क्योंकि स्टाक लिमिटेड है।

**श्रीशंकर केन्द्र**

**पो० : कतरी सराय ( गया )**

# संत तुकोबांची अमृतवाणी

## तूं अमृताहूनही गोड आहेस

—संत विनोबा

माउलीहून मायाळ। चंद्राहूनि शीतळ।
पाणियाहूनि पातळ। कल्लोळ प्रेमाचा ॥ १ ॥
देऊं काशाची उपमा। दुजी तुज पुरुषोत्तमा।
ओंवाळूनि नामा। तुझ्यावरूनि टाकिलों ॥ २ ॥
तुवां केलें रे अमृता। गोड त्याहि तूं परता।
पांचा तत्त्वांचा जनिता। सकळ-सत्ता-नायक ॥ ३ ॥
काहींच न बोलोनि आतां। उगाच चरणीं ठेवितों माथा।
तुका म्हणे पंढरिनाथा। क्षमा करीं अपराध ॥ ४ ॥

(१) तूं माउलीहूनि मायाळ—'आई' ह्या एका शद्वांत काय येतें आणि काय येत नाहीं; हें कोण मायेचा पूत सांगू शकेल ?

कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति।

असें 'का मे जननी को मे तातः' म्हणणाऱ्या आचार्यांचेच उद्गार आहेत. पण कलियुगांत जशी श्रुति मलिन झाली तशी आई हि एखादे वेळीं मुलावर विटली तर आश्चर्य मानतां येत नाहीं. पण—

कदाचित विटेल बा तव दया न दीनावरी। —केका

(२) चंद्राहूनि शीतळ। पाणियाहूनि पातळ—
जाणों जगीं आप बोलें। तें तुझिया बोला सुरस झालें।
तुझेनि क्षमत्व आलें। पृथ्वीयेसी ॥

रविचंद्रादि शुक्ती । उदय करिती त्रिजगती ।
तें तुझिया दीप्ती । तेज तेजीं ॥—ज्ञानदेव

(३) कल्लोळ प्रेमाचा—

'राया जो निर्मळु । निष्कलंक लोक-कृपाळु ।
शरणागतां स्नेहाळु । शरण्य जो ॥
पैं सुर-सहाय-शीळ । लोक-लालन-लीळ ।
प्रणत-प्रतिपाळ । खेळ जयाचा ॥'
'जो भक्तजन-वत्सल । प्रेमळजन-प्रांजळ ।'—ज्ञानदेव

(४) देऊं काशाची उपमा । दुजी तुज पुरुषोत्तमा —

जर ईश्वराला दुसऱ्या एखाद्या वस्तूची उपमा देतां आली तर तीच वस्तु ईश्वर कां होणार नाहीं ? कारागिराला चित्राची उपमा कशी देतां येईल ?

'एकमेवाद्वितीयम् ।'—श्रुति
'यो विश्वस्य प्रति-मानं बभूव ।'—ऋग्वेद

**अर्थ**—जो विश्वाचें माप बनला (त्याचें माप कसें काढणार ?)

(५) ओंवाळूनि नामा । तुझ्यावरूनि टाकिलें—

'स्वानंदाचे ताटीं धूप दीप पंचारती वो ।
ओंवाळिली माता विठाबाई पंच-भूतीं वो ।'—तुकाराम
'तेथ अहं धूप जाळूं । नाहं तेजें ओंवाळूं ।
सामरस्यें पोटाळूं । निरंतर ॥—ज्ञानदेव

पंचप्राणांची पंचारती केल्याशिवाय पूजा समाप्त होत नाहीं.

(६) तुवां केलें रे अमृता । गोड, त्याहि तूं परता—

जीवाचें जीवन अमृताची तनु ।
ब्रह्मांड-भूषणु नारायण ॥
गोडाचेंहि गोड हर्षाचेंहि कोड ।
प्रीतीचाहि लाड नारायण ॥—तुकाराम

'परमामृताचें' वर्णन ज्ञानेश्वर महाराजांच्या शब्दांत—

जें मंदराचळ न ढाळितां । क्षीरसागर न ढहुळितां ।
अनादि स्वभावतां । आइतें आहे ॥
जें स्रवे ना द्रवे नव्हे बद्ध । जेथ नेणिजती रस गंध ।

जें भलतेया हि सिद्ध । आठवलें चि फावे ॥
जयाची गोठी चि ऐकत खेवो । आघवा संसार होय वावो ।
बळिया नित्यता लागे येवों । आपणपेंया ॥
जन्म-मृत्यूची भाख । हारपोनि जाय निःशेख ।
आंतबाहेरीं महासुख । वाढों चि लागे ॥

( ७ ) पांचा तत्त्वांचा जनिता । सकळ-सत्ता-नायक—

'भयादस्याग्निस्तपति । भयात् तपति सूर्यः ।
भयादिन्द्रश्चाग्निश्च । मृत्युर्धावति पञ्चमः ॥'— श्रुति
'आकाशें सर्वत्र वसावें । वायूनें नावभरी उगें नसावें ।
पावकें दाहावें । वर्षावें जळें ॥
पर्वतीं बैसका न संडावी । समुद्रीं रेखा नोलांडावी ।
पृथ्वीया भूतें वाहावीं । हे आज्ञा माझी ॥
ज्यां बोलविल्या वेद बोले । ज्यां चालविल्या सूर्य चाले ।
ज्यां हालविल्या प्राण हाले । जो जगातें चाळिता ॥,—ज्ञानदेव

( ८ ) कांहींच न बोलोनि आतां । उगाची चरणीं ठेवितों माथा—

यालागीं आतां । स्तुति सांडूनि निवांता ।
चरणीं ठेविजे माथा । हें चि भलें ॥—ज्ञानदेव

( ९ ) तुका म्हणे पंढरीनाथा । क्षमा करीं अपराध—

'आतां ऐसिया अपराधां । मर्यादा नाहीं गोविंदा ।
म्हणोनि रक्ष रक्ष प्रमादा- । पासोनियां ॥'
'पुत्राचे अपराध । जरी झाले अगाध ।
तरी पिता साहे निर्द्वंद्व । तैसे साहिजो जी ॥'
'आणि देवाचेनि क्षमत्वें क्षमा ।
आधार जाली आहे या भूतग्रामा ।
म्हणौनि जी पुरुषोत्तमा ।
विनवूं तें थोडें ॥
तरी आतां अप्रमेया । मज शरणागता आपुलिया ।
क्षमा कीजो जी यया । अपराधांसी ॥'—ज्ञानदेव

## सफेद दाग से निराश क्यों ?

हमारी सुपरीक्षित आयुर्वेदिक 'अमृत बूटी' सफेद दाग में पूरा लाभ पहुचाने वाली दवा सन् १९४६ से संसार में विख्यात है। इससे सिर्फ ३ ही दिनों में दाग का रंग बदलने लगता है। इस दीर्घकाल में हजारों ने इससे लाभ उठाया है और हमें कई प्रशंसा-पत्र मिले हैं। रोग विवरण के साथ पत्र लिखकर दवा शीघ्र मंगाकर देखें कि यह कितनी तेज है। प्रत्येक रोगी को प्रचारार्थ एक फायल लगाने वाली दवा मुफ्त दी जा रही है। स्टाक सीमित है। दवा जल्द मंगा लें और सुनहरे मौके से लाभ उठावें।

नोट :—नक्कालोंसे सावधान।

## सफेद बाल से निराश क्यों ?

सतत परिश्रम और खोज के बाद सुगन्धित आयुर्वेदिक 'ग्रे हाल्ट' केश तेल हरी जडी बूटियों से बनाया गया है। यह बालों को सफेद होने से रोकता है और सफेद बालों को काले बालों में बदलने में मदद करता है। हजारों प्रशंसा-पत्र यदि आप मिल चुके हैं। यदि आप बालों को काला देखना चाहते हैं तो एकबार अवश्य परीक्षा करें। मूल्य ९ रु० एकत्र तीन शीशी २५ रु०।

शंकर चिकित्सा केन्द्र

पो० कतरीसराय (गया)

# श्रीसाईबाबा फाऊंडेशन

## देणग्यांची साभार पोंच

( रु. १०० व त्यावरील देणग्या देणारांची नावें )

| अ.नं. | नांव | पत्ता | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | श्री. सी. पी. गोडसे | चॅरिटी कमिशनर. महाराष्ट्र राज्य, मुंबई १ | १०१ |
| २ | श्री. पी. के. सावंत | शेतकी मंत्री, महाराष्ट्र राज्य, सचिवालय मुंबई १ | २०२ |
| ३ | श्री. एस. के. वानखेडे | अर्थमंत्री महाराष्ट्र राज्य सचिवालय मुंबई १ | १०१ |
| ४ | श्री. वसंतराव देसाई | २७, पेडर रोड, मुंबई २६ | १०० |
| ५ | श्री. आर. ए. थोरात | ' लक्ष्मी भुवन ' ८०३ सी डॉ. आंबेडकर रोड, मुंबई १४ | १०१ |
| ६ | श्री. बी. पी. दलाल | | २०१ |
| ७ | श्री. सयाजीराव एच पवार | पोष्ट--वाघाडी, ता. शिरपूर जिल्हा धुळे | १०० |
| ८ | श्री. अरुण विश्वनाथ कवळी | कै. विश्वनाथ सदाशिव कवळी यांचे स्मरणार्थ | २०१ |
| ९ | श्री. एस. एफ. पटेल | पोष्ट बॉक नं १ केनिया इ. पूर्व आफ्रिका | १०१ |
| २० | श्री. एल. बी. पालेकर | ' शारदासदन ' फ्लॅट नं. ७ कोहिनूर रोड दादर मुंबई १४ | १०१ |
| २१ | श्री. जी. ए. खवणेकर | ईव्हन हो ८१ ए कॅडल रोड, ब्लॉक नं. ४ माहिम मुंबई १६ | १०१ |
| १२ | श्री. आर. एस. सोमय्याझुलू | इंडियन लीफ टोबॅको डेव्हलपमेंट कंपनी लि. पो. बॉक्स नं. ३०३ गुंटुर ४ | ११६ |

| अ. नं | नांव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १३ | डॉ. आर. टी. काकडे | गीता क्लिनिक ॲन्ड मॅटरनिटी होम ३-२-८३६ काचिगुडा हैद्राबाद २७ आंध्र प्रदेश | ५०१ |
| १४ | श्री. पी. डी. दलाल | चार्टर्ड अकौन्टन्ट, धुळे | ५०१ |
| १५ | श्री. सी. के. रामनाथचेट्टी | रीसर्च ऑफिसर, फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिटयूज डेहराडून | २२५ |
| १६ | श्री. ए. व्ही. पराडकर | 'श्री बिल्डींग' दुसरा मजला, आर. सी. रोड चेंबूर मुंबई ७१ | २५० |
| १७ | मिस. पराडकर कमलाबाई व्ही. | 'पराडकर बंगला, मेढा, माल्वण जिल्हा रत्नागिरी. | २५० |
| १८ | सौ. स्नेहलता भट C/o. श्री जी. आर. भट | स्टेट बॅंक हाऊसिंग सोसायटी पांचवा रस्ता, सांताक्रुझ (पूर्व) मुंबई ५५ | १०१ |
| १९ | श्री. व्ही. व्ही. नाडकर्णी आणि फॅमिली | १६७। बी 'पुनावाडी' डॉ. आंबेडकर रोड मुंबई १४ | १०१ |
| २० | श्री. जे. आर. मुधोळकर | ३१, औरंगजेब रोड दिल्ली. | १०० |
| २१ | श्री. रतनचंद एस. बनसल | खो. नं. ४ शिरीषकुंज, चंदनबाग महात्मा गांधी रोड मुलुंड मुं. ८० | १११ |
| २२ | श्री. जे. आर. कॉन्ट्रॅक्टर | सिक्कीम डिस्टीलर्स लिमिटेड पोस्ट रंगपो. सिक्किम | ५०१ |
| २३ | श्री. एस. एम. आपटे | 'सत्यम् शिवम् सुंदरम्, सायन सर्कल, सायन मुंबई २२ | १०१ |
| २४ | श्री. एम. सी. शेट्टी | १११-ए।५ जवान नगर टिळक रोड, घाटकोपर मुंबई ७७ | ४०० |
| २५ | श्री. व्ही. एस. पागे | | |
| २६ | स्वामी साई शरणानंद | | १०१ |
| २७ | श्री. गिरीशभाई भचेच | | १२९ |
| | | ' शारदासदन ' खजूरी पोळ स्वामी साई शरणाआनंद काल्रूपूर अहमदाबाद. | १२१ |
| २८ | श्रीमती रतनबाई खारकर | १६०, हिन्दुकॉलनी दादर, मुं. १४ | १०० |
| २९ | श्री. रणछोडभाई पटेल स्वामी साई शरणानंद | शारदासदन खजूरी पोळ कातूपूर अहमदाबाद | |

| अ. नं. | नांव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ३० | डॉ. आर. बी. अगरवाल एम. बी. बी. एस. | मोरशी जि' अमरावती. | १०१ |
| ३१ | मिसेस पी. नारायण | २३, मे ल्फॉवर कारमायकेल रोड मुं. २६ | १५१ |
| ३२ | श्री. एस. जी. सारंगधर | ५० । सी डहाणूकरवाडी कांदिवली मुं. ६७ | १०१ |
| ३३ | श्री. एन्. एम्. कामटे | बिकन बॅकबे रेक्लमेशन मुं. १ | १५१ |
| ३४ | श्री. देवचंद वेलजी शाह | श्री. बाबा नगर बी. ३९ सेंट पिटर रोड बांद्रा मुं. ५० | ५०० |
| ३५ | मेसर्स पै ॲटोमोबॉइल आणि कंपनी | ६१ । ५ ( २-२-१३९ महात्मा गांधी रोड, सिकंदराबाद ए. पी. | ५०१ |
| ३६ | डॉ. एन. एन् मुदलियार एम्. बी. बी. एस्. | रेल्वे स्टेशन जवळ, अमरावती; | १०१ |
| ३७ | मिसेस डी. एन्. अडवानी | ' गॉडस गिफ्ट ' ९०, सेल्सबरी पार्क पुणें | १०० |
| ३८ | श्री. एस. एन्. गायतोंडे | ' प्रकाश ' ७५, शिवाजीपार्क रानडे रोड, मुं. २८ | २५१ |
| ३९ | सौ. कमला एस. गायतोंडे | ' प्रकाश ' ७५, शिवाजीपार्क रानडे रोड, मुं. २८ | २५१ |
| ४० | श्री. आर. रामानंद राव | इंडियन लिफ टोबॅळो डेव्हलपमेंट कं. लि. पो. बोक्स नं. ३०३ गुंटुर ४ आंध्रप्रदेश | १०० |
| ४१ | श्री. एस. एस. आचार्य | ' सुयोग ' ४-१-८९६ ए टिळक रोड हैद्राबाद ए.पी. | १०१ |
| ४२ | श्री. एन्. के. सुब्बाराव | मेसर्स गॉडफ्रे फिलिप्स चकला अंधेरी मुं. ६९ | १०१ |
| ४३ | श्री. विश्वनाथ विठ्ठल विचू | ' सिंगनिवास ' टायकल वाडी मुं. १६ | १०१ |
| ४४ | श्री. कृष्णा बुधाजी गावडे | | ५०१ |
| ४५ | श्री. जगन्नाथ डी. परगट | | १०१ |
| ४६ | श्रीमती सुशीला जयराम आंबर्डेकर | २८३, शनिवारपेठ परांजपे चाळ, पुणें २ | १०१ |

| अ. नं. | नांव | पत्ता | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ४७ | मेसर्स अहुजा आणि कं. | विक्टोरिया रोड, मुस्ताफा बझार, मुं. १० | १०१ |
| ४८ | मेसर्स प्रकाश डेकोरेटर्स | 'टोपीवाला मंझील' न. चि. केळकर रोड, दादर, मुं. २८ | १५१ |
| ४९ | डॉ. आर. के. गुडे | ८–ए 'मॉर्निंग स्टर' सितलादेवी टेंपल रोड, माहिम, मुं. १६ | १०१ |
| ५० | ऑनररी सेक्रेटरी श्री साईधाम | दूआर्ट वाडी ३६५ सी. व्ही. पी. रोड, मुं ४ | ५०१ |
| ५१ | श्री. मनोहर बाळाराम मानकर | दादाजी धाकजी आणि कं. प्रा. लि. २७४, सॅम्युअल स्ट्रीट, वडगादी, मुं. ३ | १०१ |
| ५२ | श्री. एम्. एम्. पिंगे | पिंगेज् क्लासेस, बिस्मिल्ला बिल्डींग, दादर, मुं. २८ | ५०१ |
| ५३ | एस. जी. नाईक आणि कं. इंजिनियर्स | कूपर्स कंपाउंड त्र्यंबक परशुराम स्ट्रीट, मुं. ४ | १०१ |
| ५४ | उषा ट्रेडींग कं. | मुंबई १४ | |
| ५५ | श्री. आर. एन्. लिमये | सेंट्रल अॅव्हेन्यूज् बिल्डींग, इंद्रप्रस्थ मार्ग, न्यू दिल्ली | १११ |
| ५६ | पी. जे. चिन्मुळगुंड | प्लॉट नं. ३, वूडलँडस ब्लॉक ७ ए।१० वेलस्ली रोड, पुणे ५ | १०१ |
| ५७ | एस. एस, व्यवहारकर | १२६–३५२० पंतनगर घाटकोपर, मुं. ७५ | १०१ |
| ५८ | श्रीमती मणी एस. साहुकार | नं. ५० एफ् हिलरोड, वांद्रा, मुं. ५० | १०१ |
| ५९ | मिसेस् जे. जे. मुधोळकर | ३१, औरंगजेब रोड, न्यु दिल्ली. | १५१ |
| ६० | श्री. ए. एच. धर्माधिकारी माईन मॅनेजर | मॅगनीज ओर इंडिया लि., पो. कंडा, जिल्हा नागपूर | १०१ |
| ६१ | मेसर्स जे. एम्. मेहता आणि कं | मुंबई, | १०१ |
| ६२ | मेसर्स हेरिटेज | १७, प्रभादेवी ईंडस्ट्रीयल इस्टेट, तिसरा मजला, प्रभादेवी, मुं. २५ | १०१ |

( देणगीदारांची नांवें पुढील अंकीं )

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality–by Pradhan | | १-०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) श्री. थोंड | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) श्री.. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | कीर्तन पंचक | (मराठी) श्री. देव | १-५० |
| (१५) | शीलधी | (मराठी) डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि | (मराठी) कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | Guide to Shirdi (English) | | ००-१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | ००-२० |

व्ही. पी. ची पद्धत नाहीं.

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 9½" × 13½" medium | 00-37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum durchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Receiver Shri Sai Baba Sansthan,**
   P. O. Shirdi., Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.